संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २३८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com   Epaper - www.sandhyaepaper.com   www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# साखरेचा गोडवा कायम राहणार

### केंद्र सरकारचं मोठं पाऊल, १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी

■ मुंबई (दै. संध्या)




सणासुदीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच सर्वसामान्य ग्राहकांना महागाईचा फटका बसू नये यासाठी केंद्र सरकारने आता मोठं पाऊल उचलले आहे. वाढत्या किमती आणि घटत चाललेल्या पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता सुधारण्यासाठी सरकारने 10 लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या दोन महिन्यांत साखरेच्या दरात सुमारे 40 टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. असे असतानाच हा निर्णय घेण्यात आला असून सर्वसामान्य नागरिकांना यामुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. सणासुदीच्या काळात देशांतर्गत मागणी पूर्ण करणे आणि बाजारातील किमतींवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने सरकारने हे पाऊल उचलल्याचे बोललं जात आहे.

सणासुदीच्या दिवसांपूर्वी साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने गुरुवारी एक अधिसूचना जारी करून, कच्च्या साखरेच्या आयातीवरील शुल्क मर्यादा तात्पुरती हटवली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून साखरेच्या किमती सातत्याने वाढत होत्या. ऑगस्टच्या सुरुवातीला, किरकोळ साखरेचे दर 48 ते 50 रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचले होते, तर घाऊक दर 4,750 ते 4,800 रुपये प्रति क्विंटलच्या दरम्यान होते.

अशातच, आता, 31 ऑक्टोबर 2026 पर्यंत, 10 लाख टन कच्ची साखर कोणत्याही आयात शुल्काशिवाय देशात आयात केली जाईल. ही सूट टॅरिफ रेट कोटा (TRQ) अंतर्गत देण्यात आली आहे, याचा अर्थ ही सुविधा केवळ एका विशिष्ट प्रमाणासाठी उपलब्ध असेल, त्यानंतर जुने शुल्क पुन्हा लागू होईल, अशी माहिती आहे. यापूर्वी, आयात धोरण शुल्कमुक्त होते, परंतु त्यात कोणत्याही विशेष अटींचा उल्लेख नव्हता. आता, 31 ऑक्टोबर 2026 पर्यंत, 10 लाख मेट्रिक टनच्या शुल्क-मुक्त दर कोट्याच्या समावेशासह हे धोरण शुल्क-मुक्त राहील. दरम्यान, ज्या कंपन्यांना टीआरक्यू योजनेअंतर्गत आधीच अग्रिम प्राधिकार जारी करण्यात आले आहेत, त्यांना त्यांचे प्राधिकार अग्रिम प्राधिकार योजनेतून टीआरक्यू योजनेत रूपांतरित करण्याचा एक-वेळचा पर्याय देण्यात आला आहे. हा पर्याय अधिसूचनेच्या तारखेपर्यंत प्रत्यक्षात आयात केलेल्या कच्च्या साखरेच्या प्रमाणासाठी उपलब्ध असेल. यामध्ये त्या कच्च्या साखरेपासून उत्पादित केलेली शुद्ध साखर आणि त्यानंतर त्या कच्च्या साखरेपासून उत्पादित केलेली शुद्ध साखर यांचा समावेश असेल. तर ही सूट विनामूल्य नाही. हा बदल करण्यासाठी, कंपन्यांना आयातीच्या वेळी मिळालेली जीएसटी सूट भरावी लागेल.

# लोकांना त्रास दिलात ना?

### भोगा आता! तुकाराम मुंढेंच्या FDA ची कारवाई; हाय कोर्टानं हॉटेलला सुनावलं


■ मुंबई (दै. संध्या)



मुंबई उच्च न्यायालयानं ठाण्यातील उडुपी स्वाद रेस्टॉरंटला तातडीनं दिलासा देण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वात अन्न आणि औषध प्रशासनानं ॲनालॉग पनीरच्या वापरावरून उडुपी स्वाद हॉटेलचा परवाना निलंबित केलेला आहे. त्या विरोधात हॉटेलनं न्यायालयात दाद मागितली. पण न्यायालयानं उडुपी स्वादला दिलासा दिलेला नाही.

मुख्य न्यायाधीश रविंद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अनखड यांच्या पीठानं रेस्टॉरंटनं दाखल केलेली याचिका फेटाळली आहे. ग्राहकांना बनावट आणि हानीकारक जेवण वाढून त्रास देणाऱ्यांना आता तसाच त्रास भोगावा लागेल, अशा शब्दांत न्यायालयनं ताशेरे ओढले. रेस्टॉरंटवर झालेली कारवाई काव्यात्मक न्याय असल्याचं न्यायालयानं म्हटलं. 'तुम्ही लोकांना हानीकारक खाद्यपदार्थ खाऊ घातलेत. त्यांना त्रास दिलात. त्यामुळे आता तुम्हाला भोगावं लागेल. यावेळी आम्ही कठोर पवित्रा घेणार आहोत,' असं न्यायालयानं म्हटलं. आम्ही वापरत असलेलं पनीर दुधापासून नव्हे, तर ॲनालॉगपासून तयार करण्यात आलंय, असं स्पष्ट शब्दांत तुम्ही मेन्यू कार्डमध्ये लिहिलं होतं का, असा थेट सवाल न्यायालयानं हॉटेल व्यवस्थापनाला विचारला. पनीरच्या नावाखाली तुम्ही लोकांना भलतंच काहीतरी खाऊ घातलं आणि आता सुधारणेसाठी नोटिस द्यायला हवी होती, असं म्हणता. आमच्याकडे अस्सल जेवण उपलब्ध नाही, अशी पाटीच तुम्ही का लावत नाही, असा प्रश्न न्यायालयाकडून हॉटेल व्यवस्थापनाला विचारण्यात आला. एफडीएनं थेट कारवाई करण्याआधी आम्हाला एक सुधारणा नोटिस द्यायला हवी होती, असं हॉटेल व्यवस्थापनानं याचिकेत म्हटलं होतं. भविष्यात कधीही ॲनालॉग पनीरचा वापर करणार नाही, अशी खात्री सुनावणी दरम्यान हॉटेलकडून न्यायालयाला देण्यात आली. पण न्यायालयानं हा युक्तिवाद फेटाळून लावला. आपण काय खातोय हे जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार ग्राहकांना आहे. तुम्ही ग्राहकांना ती वस्तू कशी काय वाढू शकता, जी त्यानं मागितलेलीच नाही? तुमच्यावर दंड लावायला हवा. पीडित ग्राहकांनी ग्राहक संरक्षण न्यायालयात जाऊन भरपाई मागायला हवी, असं न्यायालयानं म्हटलं.

## थोडक्यात...



### महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद : राहुल गांधी

पुणे : दैनिक संध्या

महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद असल्याचे मत कॉंग्रेस खासदार राहुल गांधी यांनी व्यक्त केले. महिला कधीच स्वतंत्र राहू नये हा मनस्मृतीचा डाव असल्याचे राहुल गांधी म्हणाले. तुम्ही स्वत:शिवाय कोणालाच बांधिल नाही आहात. महिलांवर कोणत्याही पुरुषाचा अधिकार नाही. महिलांनी विविध क्षेत्रात उल्लेखनिय यश मिळवलं आहे, तरीदेखील त्यांना विशिष्ट चौकटीत बसवलं जात असल्याची खंत राहुल गांधी यानी व्यक्त केली. राहुल गांधी पुण्यात आयोजीत करण्यात आलेल्या छात्रो की गुंज या कार्यक्रमात बोलत होते. पिंजरा तोडा हीच या कार्यक्रमाची संकल्पना आहे. मी इथे राजकारणावर बोलायला आलो नाही असेही राहुल गांधी म्हणाले. शिक्षणातही मुलींसोबत भेदभाव केला जात असल्याचे गांधी म्हणाले. तरुणांची लोकसंख्या ही भारताची सर्वात मोठी ताकद आहे.

### ‘राष्ट्रवादी नेहमी खोडा घालणारा पक्ष : दळवी

मुंबई : दैनिक संध्या

राज्यात महायुती भक्कम असली, तरी रायगड जिल्ह्यामध्ये मात्र शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यातील राजकीय वाद मिटण्याचे नाव घेत नाहीये. शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यातील वाद पुन्हा एकदा पेटला असून, महेंद्र दळवी यांनी राष्ट्रवादीसह सुनील तटकरेंवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. पत्रकारांशी बोलताना महेंद्र दळवी म्हणाले, "राष्ट्रवादी नेहमी खोडा घालणारा पक्ष आहे. राष्ट्रवादीला आम्ही गणतीत पकडत नाही." तसेच भाजप आणि आमचे विचार जुळतात, असे स्पष्ट करत रायगडमध्ये तिन्ही पक्षांच्या एकत्रित काम करण्याच्या मुद्द्यावरून त्यांनी जोरदार आगपाखड केली. आगामी काळात रायगड लोकसभेवर शिवसेनेचाच भगवा असेल आणि या लढाईसाठी एक नाही तर चार जण तयार असून ही लढाई आम्ही नक्की जिंकू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याच वेळी त्यांनी "तटकरे कुटुंबाला येणाऱ्या काळात मोठा झटका मिळेल," असा घणाघाती इशाराही दिला. रायगडच्या पालकमंत्रीपदी भरत गोगावले यांची निवड झाल्यानंतर शिवसैनिकांनी मोठा जल्लोष साजरा केला होता. मात्र, भरत गोगावले यांना पालकमंत्री करण्यासाठी माझ्यादेखील पुढाकार होता, असे वक्तव्य सुनील तटकरे यांनी अलिबाग येथील पत्रकार परिषदेत केले होते. या वक्तव्याचा खरपूस समाचार घेत अलिबागचे आमदार महेंद्र दळवी म्हणाले, "पालकमंत्री पदाचे श्रेय सुनील तटकरेंनी घेऊ नये. तटकरेंनी आता स्वतःचे आत्मपरीक्षण करावे. त्यांनी उगीच याबाबत श्रेय घेऊ नये. भरत गोगावले हे सर्वसामान्य जनतेतील कार्यकर्ते आणि नेते आहेत. शिवाय सर्वाधिक जनाधार आमच्याकडे असल्यामुळे तो आमचा अधिकार होता आणि तो आम्हाला मिळाला."




## खेळाडूंच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव पाठीशी राहणार – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

■ पुणे (दै. संध्या)

■ खो-खो असोसिएशनची बैठक संपन्न; कामकाज होणार पेपरलेस; २३ जिल्ह्यांच्या सचिवांना लॅपटॉप


बदलत्या युगात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे कामकाज पेपरलेस करण्याच्या उद्देशाने असोसिएशनच्या जिल्हा संघटकांसह तांत्रिक समितीला लॅपटॉपचे वितरण उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्ष सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. खेळ आणि खेळाडूंच्या सन्मानासाठी तसेच त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव पाठीशी राहू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा क्रीडा मंत्री श्रीमती पवार यांनी दिली. या कार्यक्रमाला असोसिएशनच्या उपाध्यक्ष अश्विनी पाटील, सरचिटणीस डॉ. चंद्रकांत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार गोविंद शर्मा, शिवछत्रपती क्रीडा संघटक पुरस्कार प्राप्त जनार्दन शेळके, अर्जून पुरस्कार प्राप्त सुरेखा कुलकर्णी, श्रीरंग इनामदार उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, बदलत्या युगामध्ये नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज बनली असून लॅपटॉपमुळे पेपरलेस कामकाजाला सुरुवात होईल. स्व. अजित दादांनी खो-खो खेळाच्या चौफेर प्रगतीसाठी अत्यंत तळमळीने प्रयत्न केले. त्यांच्याच संकल्पनेतून पेपरलेस कामकाजासाठी लॅपटॉप वितरण होत असल्याचे सांगितले.

# वरळीतील नागरी समस्या तात्काळ सोडवाव्यात

### उपसभापती सचिन अहिर : महापालिका आयुक्तांसोबत बैठक

■ मुंबई (दै. संध्या)



वरळी परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर विकासकामे होत आहेत. मात्र, स्थानिक नागरिकांच्या मूलभूत नागरी समस्या आणि अडचणी तात्काळ मार्गी लावाव्यात, असे निर्देश उपसभापती सचिन अहिर यांनी दिले. विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्या दालनात यासंदर्भात बैठक झाली. यावेळी बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे उपस्थित होत्या.

बैठकीत वरळीतील विविध प्रलंबित समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. महापालिका आयुक्तांनी हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बैठकीत आरोग्य व्यवस्था, वाहतूक कोंडी, घनकचरा व्यवस्थापन, पार्किंग आणि उड्डाणपुलांची जोडणी यांसारख्या नागरी समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. वरळी धोबीघाट येथे प्रसूतीगृह आणि लहान मुलांचे विशेष रुग्णालय उभारावे. माता रमाई आंबेडकर हिंदू स्मशानभूमी येथील सुविधांचे बळकटीकरण आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानकासमोरील फूटपाथची कामे, कोस्टल रोड परिसरात उद्यानांची कामे तसेच देखभाल आणि सुशोभीकरण करण्याचे निर्देश उपसभापती सचिन अहिर यांनी दिले. नेहरू सायन्स सेंटर मेट्रो स्थानकाजवळील डेब्रिज (कामाचा कचरा) हटवून जागा मोकळी करण्याचे तसेच मेट्रोची कामे पूर्ण झाल्याने एमएमआरडीएने पालिकेला जागा हस्तांतरित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. सात रस्ता येथील मोनोरेल ब्रिज मेट्रो स्टेशनला जोडणीचे काम तातडीने पूर्ण करावे. पालिकेच्या वाहनतळांवर पे अँड पार्क स्थानिकांसाठी सवलतीच्या दरात मासिक पास उपलब्ध करून द्यावेत. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी डम्पिंग ग्राऊंडचा नवीन सुधारित आराखडा तयार करावा, आदी सूचनाही उपसभापती सचिन अहिर यांनी केल्या.

वरळीतील परिसराचा विकास साधताना स्थानिक नागरिकांचे हित आणि पुनर्वसन सुरक्षित ठेवण्याचा निर्धार याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. बैठकीस महापालिकेचे संबंधित विभागाचे उपायुक्त आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुंबईत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील मंत्री, आमदार यांच्या सहकार्याने उपसभापती सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात समन्वय समितीची पहिली बैठक झाली.

# सावित्रीबाईंच्या विचारांची ज्योत पिढ्यान्‌पिढ्या तेवत राहील

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ज्ञानशिल्पाचे उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण

■ पुणे (दै. संध्या)



सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची आणि परिवर्तनवादी विचारांची साक्ष देणाऱ्या २८ ज्ञानशिल्पांचे लोकार्पण करण्याचे भाग्य लाभणे हा माझ्यासाठी मनस्वी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. या ज्ञानशिल्पांतून शिक्षण, मानवता, समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित ज्ञानशिल्प लोकार्पण समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, कुलसचिव प्रा. डॉ. कपिल पवार, विद्यापीठाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे, विविध व्यवस्थापन मंडळांचे सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सामाजिक समतेसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्याचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही. त्यांनी केवळ एका पिढीला शिक्षण दिले नाही, तर पुढील अनेक पिढ्यांसाठी परिवर्तनाची वाट निर्माण केली.

सावित्रीबाईंच्या जीवनकार्याचे विविध पैलू या ज्ञानशिल्पांतून मांडण्यात आले आहेत. पुण्यातील भिडेवाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू करणे, पहिल्या महिला शिक्षिका म्हणून कार्य करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, कवयित्री व साहित्यिक म्हणून योगदान, सत्यशोधक चळवळीत सहभाग आणि प्लेगच्या महामारीत रुग्णांची सेवा करणे, अशा अनेक कार्यांचा यात समावेश आहे. “या ज्ञानशिल्पांमध्ये आरसा लावून त्याखाली ‘मी कोण?’ असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्या आरशात पाहताना मलाही हा प्रश्न पडला. पुढच्या क्षणी जाणवले की मी सावित्रीची लेक आहे. एका छोट्या गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या माझ्यासारख्या मुलीला आज महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली, यामागे सावित्रीबाईंच्या कार्याची प्रेरणा आहे. त्याबद्दल मी सदैव ऋणी आहे,” असे उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या.

महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी काम करताना मोठा विरोध आणि त्रास सहन केला. मात्र, त्यांनी आपल्या ध्येयापासून कधीही माघार घेतली नाही. सावित्रीबाईंनी पेटवलेली शिक्षणाची ज्योत आज देशभर प्रकाश देत असून, त्याच संघर्षाच्या बळावर महिला आज विज्ञान, शिक्षण, प्रशासन, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि शेतीसह प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करत आहेत, असे पवार यांनी नमूद केले. पुण्यातील ऐतिहासिक भिडेवाड्यात फुले दाम्पत्याचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्या कामासाठी अजितदादा पवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. आवश्यक परवानग्या मिळवून हे काम पुढे नेण्यासाठी त्यांनी विशेष पाठपुरावा केला, अशी आठवणही त्यांनी यावेळी सांगितली.

महाराष्ट्राला जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा महान वारसा लाभला आहे. जिजाऊंनी छत्रपती शिवरायांना संस्कार दिले, सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, तर अहिल्यादेवींनी लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श निर्माण केला. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक मुलगी ही जिजाऊ, सावित्री आणि अहिल्येची लेक आहे, असे त्यांनी सांगितले.

महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकारकडून ‘लेक लाडकी’, ‘लाडकी बहीण’, ‘पिंक रिक्षा’, ‘लखपती दीदी’ यांसारख्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, ही महाराष्ट्राची भावना आहे. त्यांच्या महान कार्याचा योग्य सन्मान व्हावा, यासाठी महाराष्ट्र विधानसभेने केंद्र सरकारकडे एकमताने शिफारस केली असल्याचेही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी सांगितले.

## साखरेच्या दरवाढीवर मुख्यमंत्र्यांना पत्र

■ मुंबई (दै. संध्या)

देशभरात साखरेच्या भावात मोठी वाढ होत आहे. ऐन सणासुदीच्या काळात सातत्याने होणाऱ्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या खिशयावर ताण पडत आहे. शिवाय नागरिकांचे आर्थिक गणित देखील कोलमडलं असल्याचे चित्र आहे. एकंदरीत या सर्व महागाईच्या पार्श्वभूमीवर सरकारने महसूल वाढवण्यासाठी दारूच्या किमतीत दहा पटीने वाढ करावी आणि साखरेचे भाव निम्म्यावर आणावे, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मागणी केली आहे. शिवाय सरकारने कोणताही निर्णय घेतला तरी सामान्य नागरिक त्या विरुद्ध आंदोलन करत नाही, कारण त्यावर पोलीस केसेस होतात. त्यामुळे आपण जे करत आहात ते सर्वच बरोबर आहे असं नाही, असा टोमणाही त्यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला आहे. राज्यामध्ये तीन दिवसात साखरेच्या भावात न परवडणारी भाव वाढ झालेली आहे. हिंदू धर्मामध्ये सणासुदीला गोड करतातच व या करता प्रामुख्याने साखर लागते. राज्यामध्ये महिलांना हातभार लावण्याकरता आपण लाडकी बहीण योजना सुरू केली. कारण लाडक्या बहिणीची परिस्थिती चांगली नाही. राज्यामध्ये सनवाराला घरगुती पदार्थ करण्यात लाडकी बहीणच अग्रेसर असते व अशा परिस्थितीत या लाडक्या बहिणीला साखर विकत घेणे परवडत नसेल तर या महिलांना आपण लाडकी बहीण म्हणून यांचा अपमान करीत आहात.

# संपादकीय

## मोफत नव्हे; चांगली सेवा हवी

राजधानीत मोफत बसप्रवासासाठी महिलांना ‘सहेली पिंक स्मार्ट कार्ड’ सक्तीचे करण्याचा निर्णय पुन्हा लांबणीवर पडला. खरं तर लोकांना मोफत सेवा हवी, की चांगली सेवा, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. राजधानीत महिलांसाठीच्या मोफत बस प्रवासाच्या योजनेला डिजिटल वळण देण्याचा व सध्याच्या कागदी पासऐवजी ‘सहेली पिंक स्मार्ट कार्ड’ सक्तीचे करण्याचा निर्णय दिल्लीच्या सरकारनं यंदा जूनमध्ये घेतला. नंतर तो स्वातंत्र्यदिनापर्यंत आणि आता या महिनाअखेर म्हणजे ३१ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलला. दिल्ली सरकारनं आधी दिमाखात याबाबतची घोषणा केली आणि अनेक महिलांनी विरोध करत करतच कार्ड मिळवण्यासाठी घाईने रांगा लावल्या. दिल्ली परिवहन महामंडळाच्या (डीटीसी) बसल्या जागेवरून न उठणाऱ्या बस वाहकांनाही, कार्ड नसेल तर महिलांना मोफत प्रवास करू द्यायचा नाही, असा कडक संदेश देण्यात आला. पण काही दिवसांतच अनेक महिलांचा विरोध, कार्ड वितरण अपुरे, केंद्रांवर प्रचंड गर्दी, इलेक्ट्रॉनिक तिकीट यंत्रांतील तांत्रिक अडचणी, इंटरनेटचा खेळखोळंबा, पडताळणीची संथ प्रक्रिया अशी सरकारछाप वस्तुस्थिती समोर आली. या गोंधळामुळे अंमलबजावणी ३१ ऑगस्टपर्यंत पुढे गेली. अर्थात ही सध्याची तारीख आहे. त्याची अवस्था ‘तारीख पे तारीख’ होणार नाहीच, असं ठामपणे सांगता येत नाही! या सगळ्यात सर्वाधिक धावपळ झाली ती रोज बसनं प्रवास करणाऱ्या महिलांची. कार्यालयात, महाविद्यालयात जाणाऱ्यांपासून, घरकाम करणाऱ्या, परिचारिका, कर्मचारी अशा लाखो महिलांच्या रांगा केंद्रांवर लागल्या. त्यांना कागदपत्रांबाबत वेगवेगळ्या सूचना मिळाल्या. काही ठिकाणी सर्व्हर बंद, काही ठिकाणी मशीन बंद, तर काही ठिकाणी ‘उद्या या’ अशी पाटी. बहादूरशहा जफर रस्त्यावरच्या टपाल कार्यालयातल्या केंद्रांवर तर संतप्त महिलांचा रुद्रावतार रोजचाच झाला त्या काळात.

दिल्लीकरांना गेली १५ वर्षं ‘मोफत-मोफत’ची सवय लागली असताना सध्याच्या सरकारचं याबाबतीतलं म्हणणं योग्य आहे. महिला बसप्रवासासाठीच्या या स्मार्ट कार्डमुळं पारदर्शकता येईल, मोफत आहे म्हणून दिल्लीभर वाटेल तिथं फिरा, या धर्तीचा गैरवापर कमी होईल आणि अनुदानाचा हिशेब अचूक होईल. पण प्रत्येक चांगल्या कल्पनेचं यश अंमलबजावणीवर अवलंबून असतं. मुळात रेखा गुप्ता सरकारनं १ ऑगस्टची तारीख का जाहीर केली? डिजिटल प्रणाली लागू करण्यापूर्वी सर्व कार्डं वितरित करण्याची तयारीच नव्हती का? हजारो डीटीसी बसेसच्या वाहकांकडची तिकीट प्रणालीची यंत्रं व्यवस्थित चालत होती याची चाचणी घेतली होती का? या प्रश्नांची उत्तरं वेळीच शोधली असती तर मुदतवाढीची गरजच पडली नसती. पुढे व्यवस्था सुरळीत चालली, सर्व महिलांना कार्ड सहज वापरता आलं, यंत्रं नीट चालली, तर ते कौतुकास्पदच ठरेल. पण जर पुन्हा तांत्रिक अडचणी, सर्व्हर डाऊन, पडताळणीचा गोंधळ किंवा नागरिकांची धावपळ सुरू झाली तर? डिजिटल भारताचं स्वप्न नक्कीच स्वागतार्ह व गुलाबी आहे. मात्र डिजिटल व्यवस्थेची पहिली अट भक्कम पूर्वतयारी, दुसरी विश्वासार्हता आणि तिसरी नागरिकांचा विश्वास. यात आपण कुठे आहोत? स्मार्ट कार्डला विरोध होण्याचे आणखी एक कारण म्हणजे ही पिंक कार्ड ‘आधार’शी जोडलेली आहेत. म्हणजे ज्यांचं आधार कार्ड दिल्ली आणि एनसीआरचं असेल त्यांनाच ही कार्ड मिळतील. मात्र रोजीरोटीसाठी देशभरातून दिल्लीत आलेल्या महिलांची संख्या काही लाखांमध्ये आहे. बसप्रवास करणाऱ्यांमध्ये हा वर्ग मोठा आहे आणि तिथूनच आता या योजनेला विरोध होतो आहे. तो सरकारला दुर्लक्षित करणे परवडणार नाही. आधीच जेन झीमध्ये नाराजीची लाट असताना नवरात्रीच्या तोंडावर ही ‘मातृशक्ती’ राजधानीत कोपली तर? दिल्लीतला गुलाबी गोंधळ पाहताना महाराष्ट्रातलं चित्रही समोर येणं स्वाभाविक. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणची शहर बससेवांची अवस्था वेगवेगळी असली, तरी प्रश्न तोच आहे. मुंबई-नाशिक- ठाणे- पुण्यात वगैरे बसगाड्या आहेत; पण त्या वेळेवर येतील याची खात्री ब्रह्मदेवाला तरी देता येईल का?

## संस्कृत सुभाषित

नित्य कुकर्म सर्वस्व फलत्यात्मनिसर्वदा । यो
यद्वपति बीनहि, लभते सोऽपि तत्फलम्।।

अर्थ : जो कोणी कुकर्म करील म्हणजे दुराचरण करील, त्याचे फळ त्याला मिळाल्याशिवाय कदापि राहणार नाही. कारण जो जसे बी पेरील, तसेच फळ त्याला प्राप्त होईल.

## गुरु वचन

### निराधारांची सेवा हेच आपले कर्तव्य

एक डॉक्टर गांधीजींच्या विचाराने खूपच प्रभावित होते. व गांधींच्या जवळचे होते. एकदा ते गांधीजीसोबत बडोदाहून अलाहाबादला पोहोचले. गांधीजी येणार असल्याची माहिती पूर्वीपासूनच होती. यामुळे स्थानकावर कार्यकर्त्यांच्या जमावाची चांगलीच गर्दी झाली होती. गांधीजीचे हात रिकामे होते पण डॉक्टर साहेबाच्या हातामध्ये एक बॅग होती. रेल्वेमधून खाली उतरताच एका कार्यकर्ता पुढे जाऊन डॉक्टरच्या हातातील बॅग घेऊ लागला. डॉक्टरने त्याला मनाई केली. त्यावेळी डॉक्टरचे लक्ष्य एका वयस्कर महिलेवर गेले. तिच्या कमरेला एक लहान मुलगा होता व दुसऱ्या हातामध्ये काही सामान होते. त्यामुळे तिला चालण्यास त्रास होत होता. डॉक्टर जमावाला धक्का देत त्या महिलेपर्यंत पोहोचले आणि म्हणाले, ताई आपल्याला खूप त्रास होत आहे. हे सामान माझ्याकडे द्या, मी तुम्हाला स्थानकाबाहेर नेऊन सोडतो. ती महिला लाजू लागली. त्यानंतर डॉक्टर म्हणाले, घाबरु नका मी काही चोर वगैरे नाही. तुमचे सामान कुठेही जाणार नाही. महिलेने आपले सामान डॉक्टराकडे दिले. तेव्हा दुसरे लोकही तिथे आले. एका कार्यकर्ता डॉक्टराच्या हातून सामान घेऊ लागला. तेव्हा ते म्हणाले, हे खूप हलके आहे. मला काही त्रास होत नाही. तुम्ही लोक त्याची मदत करा, ज्याला तुमच्या मदतीची गरज आहे. निराधारांची सेवा करणे आपले कर्तव्य आणि धर्म आहे.

## उपदेशकथा

### यातना

अब्राहम लिंकन यांच्या जीवनातील कथा. एकदा ते सिनेटच्या बैठकीला निघाले होते. वाटेत त्यांनी पाहिले की, रस्त्याकडेच्या एका खड्ड्यातील चिखलात एक डुक्कर अडकले होते. त्यातून बाहेर पडण्यासाठी ते केविलवाणी धडपड करत होते. पण होत होते मात्र उलटेच. अखेर लिंकन तेथे गेले. त्यांनी त्या डुकराला चिखलातून बाहेर काढले. या प्रयत्नात त्यांच्या कपड्यांना खूपच चिखल लागला पण ते बदलण्यास वेळ लागेल म्हणून अखेर ते तसेच बैठकीला गेले. कपडे खराब का? हे इतर सदस्यांनी विचारण्यापूर्वीच त्यांनी सर्व प्रकार सांगितला. सगळे सदस्य त्यांच्या भूतदयेबद्दल कौतुक करू लागले. ते थांबवत लिंकन म्हणाले, ‘तुमचा काहीतरी गैरसमज होतोय. त्या डुकरावर दया दाखवण्यासाठी मी हे सारं केलेलंच नाही. त्याची केविलवाणी धडपड मला पाहवेना. माझ्या मनाला खूप यातना होऊ लागल्या. माझ्या हृदयातील कालवाकालव दूर व्हावी म्हणून मी हे सारं केलं. यात मदत झाली असेल तर ती मलाच झाली आहे.’

कथा उपदेश : दुसऱ्याच्या यातना कमी केल्याने मनाला समाधान लाभते.

## पंचांग

| पंचांग | करण:वणिज १५:११:१३ |
|---|---|
| २३ ऑगस्ट २०२६ | करण:विष्टि २८:१८:५८+ |
| रविवार | सूर्य:सिंह |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:धनु |
| श्रावण शीर्ष शके | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्– १९४८ | मुस्लिम मास – रबिलावल |
| संवत्सर – पराभवनाम | तारीख – ९ |
| अयन– दक्षिणयन | विशेष |
| मास– श्रावण | पुत्रदा एकादशी |
| ऋतु– सौर शरद | आदित्या पूजन |
| शुक्ल पक्ष | शेवाळकर महाराज |
| तिथि:एकादशी | पुण्यतिथी – अचलपूर |
| २८:१८:५८+ | (अमरावती) |
| नक्षत्र:मूल १७:४४:१८ | भारतीय भाद्रपद मासारंभ |
| योग:प्रीति (अहोरात्र) | सौर शरद ऋतू प्रारंभ |

## दैं. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १०४८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | 3 | | | | 9 | | |
| | | 9 | 2 | | | | 6 | |
| | | 2 | | 7 | 3 | | 5 | 1 |
| | | 5 | | | 1 | | 9 | |
| 2 | 8 | | 7 | | 9 | | 3 | 6 |
| | 6 | | 5 | | | 1 | | |
| 3 | 7 | | 4 | 9 | | 2 | | |
| | 2 | | | | 5 | 6 | | |
| | | 6 | | | | 3 | 8 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०४७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 5 | 8 | 3 | 4 | 7 | 6 | 2 | 1 |
| 1 | 2 | 7 | 8 | 9 | 6 | 3 | 4 | 5 |
| 3 | 4 | 6 | 5 | 2 | 1 | 8 | 9 | 7 |
| 2 | 9 | 4 | 6 | 8 | 5 | 1 | 7 | 3 |
| 8 | 7 | 3 | 4 | 1 | 2 | 5 | 6 | 9 |
| 5 | 6 | 1 | 7 | 3 | 9 | 4 | 8 | 2 |
| 4 | 1 | 5 | 2 | 7 | 8 | 9 | 3 | 6 |
| 6 | 8 | 2 | 9 | 5 | 3 | 7 | 1 | 4 |
| 7 | 3 | 9 | 1 | 6 | 4 | 2 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८३३ – थिओडोर ली मान यांनी प्राणिसंग्रहालयशास्त्राचा ओनामा केला.
- १८५८ – न्यूयॉर्कच्या एका हॉटेलात पहिली लिफ्ट बसवली गेली.
- १९३९ – रिबेन ट्रॉप–मोलोटोव्ह करार. रशिया आणि जर्मनीने एकमेकांवर आक्रमण करायचे नाही आणि पोलंडचा भूभाग वाटून घ्यायचा, असे या करारान्वये ठरले, यामुळे इंग्लंड आणि फ्रान्स यांना हादरा बसला.
- १९४० – लंडनवर प्रथमच प्रचंड बॉम्बवर्षाव– याला ब्लिट्झचा तडाखा, असे वृत्तपत्रांनी म्हटले.

### राष्ट्रीय

- १९३३ – प्रकृती चिंताजनक वाटल्याने ब्रिटिश सरकारने महात्मा गांधींची तुरुंगातून सुटका केली.
- १९५८ – पंडित जवाहरलाल नेहरू यांनी औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाचे उद्घाटन केले.
- २००६ – अहमदाबाद–राजकोट राष्ट्रीय महामार्गावर बावलाजवळ एक ट्रक उलटून १९ जण ठार झाले.

### जन्म

- १७६८ – सर ॲस्टली पॅस्टन कूपर, ब्रिटिश शल्यशास्त्रज्ञ.
- १९१२ – जॉन केली, अमेरिकन अभिनेता आणि नर्तक.
- १९१८ – विंदा करंदीकर ऊर्फ गोविंद विनायक करंदीकर, मराठीतील प्रसिद्ध कवी व समीक्षक.
- १९२३ – डॉ.व. दि. कुलकर्णी, मराठीतील सुप्रसिद्ध समीक्षक व संत साहित्याचे अभ्यासक.
- १९२३ – बलराम जाखड, लोकसभेचे माजी सभापती.

### निधन

- १९७१ – हंसा वाडकर, सांगत्ये ऐकाच्या लेखिका.
- १९७५ – विनायकबुवा पटवर्धन, सुप्रसिद्ध गायक.

## : SMS :

ya mere apane mu
ki shihahi hai
dil ke phaphole
jal uthe.
sine ke dag se.
is ghar ko aag lag gai
ghar ke chirag se.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.९ | २२.९ |
| अहमदनगर | ३१.५ | २२.२ |
| अकोला | ३३.६ | २५.१ |
| अमरावती | ३३.७ | २४.८ |
| बीड | ३६.९ | २६.८ |
| भंडारा | ३५.७ | २६.२ |
| बुलढाणा | ४४.९ | २७.७ |
| चंद्रपूर | ३७.३ | २७.१ |
| चेन्नई | ४०.७ | २७.५ |
| नवी दिल्ली | ४५ | ३१.४ |
| धुळे | ३४.७ | २४.८ |
| गोंदिया | ३३.२ | २५.८ |
| जळगाव | ३३.६ | २५ |
| कोल्हापूर | २९.१ | २२.६ |
| लातूर | ३२.४ | २२.८ |
| मुंबई | ३३.९ | २९.६ |
| नागपूर | ३५.२ | २५.१ |
| नांदेड | ३४.७ | २४.९ |
| नंदूरबार | २९.४ | २४ |
| नाशिक | २८.७ | २३.३ |
| पुणे | २६.६ | २२.१ |
| पंढरपूर | ३४.२ | २३.१ |
| सातारा | ३०.६ | २२.२ |
| सांगली | ३१.८ | २२.८ |
| सोलापूर | ३४.१ | २३.७ |
| वर्धा | ३५.७ | २६.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभेल. प्रवासाचे योग येतील. ताण–तणाव जाणवतील. थकवा जाणवेल.

**तूळ :** मुले मोठी असल्यास त्यांच्याशी मतभेदाची शक्यता आहे. गुंतवणुकीस दिवस चांगला आहे.

**वृषभ :** नातेवाईकांकडून फारशा अपेक्षा नकोत. मनोबल व आत्मविश्वास वाढेल. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. उमेद वाढेल.

**वृश्चिक :** वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. कर्मचारी, नोकरांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाची आर्थिक कामे होतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**मिथून :** कौटुंबिक जीवनात फारसे स्वास्थ्य लाभणार नाही. कुटुंबातील व्यक्तींच्या वागण्यामुळे मनाला वेदना होतील. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**धनू :** मित्रांचे विशेष सहकार्य लाभेल. वाहने सावकाश व काळजीपूर्वक चालवावीत. काही व्यक्तींबाबतीत राहत्या जागेचे प्रश्न उभे राहतील.

**कर्क :** आर्थिक लाभाच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. उधारी–उसनवारी वसूल होईल. मात्र आर्थिक क्षेत्रात धाडस नको. वैवाहिक सौख्य लाभेल.

**मकर :** अनेकांशी सुसंवाद साधाल. कामाचा ताण जाणवेल. उधारी–उसनवारी वसूल होईल. प्रवासाचे योग येतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभेल.


**सिंह :** विवाहेच्छूंचे विवाह जमतील. प्रकृतीकडे लक्ष ठेवावयास हवे. खर्च वाढणार आहेत. नोकरी व्यवसायात सुस्थिती राहील. अनेकांशी सुसंवाद साधाल.

**कुंभ :** तुमची लोकप्रियता वाढेल. करार करण्यास दिवस चांगला आहे. नवीन हितसंबंध निर्माण करू शकाल. आर्थिक कामे सहजपणाने होणार आहेत.

**कन्या :** कलाकारांना व साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना सुसंधी लाभेल. आरोग्य उत्तम राहील. उत्साह वाढेल. महत्त्वाचे निर्णय नकोत.

**मीन :** उधारी उसनवारी वसूल करणेस हीच वेळ योग्य आहे. मनोबल व उत्साह वाढेल. मित्रांचे वागणे आपल्याला दु:ख देऊन जाईल. मनस्थिती द्विधा राहील.

## ‘दैं. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १०४८



### आडवे शब्द

१. पूर्ण बंदोबस्त
४. पुष्कळ
७. नम्रतेने मान खाली घालणे
११. एक पालेभाजी व खाद्य तेल
१३. उष्ण, कढत
१५. गंध
१६. ओरखडा
१८. डाळीचे कालवण
२०. सोने
२२. खोदण्याचे काम
२४. सीतापती
२५. सोन्याचा कस
२६. बागवान
२७. सोन्याची कांब
२९. पहिला ऋतू
३१. चित्रपटाचा हिरो
३२. मर्कट
३४. आराम --- है!
३५. कठीण (प्रसंग)
३६. भीती
३८. हे मीठ देखील अळणी असते
४०. छोटा लहान
४२. सरसकट
४६. नाश, नेस्तनाबूत
४७. मातापिता
५०. पाण्यातील फूल
५२. गाव, शहर
५३. मिजास, डौल
५५. एकाग्र नजर
५६. जास्तीत जास्त व कमीत कमी
६०. वय
६१. रविवासर
६२. शर्त, पण
६४. मंत्रीमंडळ
६६. देवाणघेवाण
६८. मोठ्या पानांची एक पालेभाजी
७०. मीठाची चव
७१. च्यासह, च्या बरोबर
७३. बारीक दगड
७४. श्रीरामाचे स्तोत्र
७७. हूल देणे म्हणजे अशी हाळी
८१. अंजन
८२. कारस्थानी
८३. नवरदेव
८४. गार, थंड
८५. अरण्य

### उभे शब्द

१. किंचित कडू
२. परशुरामाची भूमी
३. टिंगल
४. खराब
५. तपास, शोध
६. स्पष्ट, सडेतोड
८. तेव्हा (ग्रा.)
९. चर्चा
१०. केर
१२. कोवळी फांदी
१४. अंत:करण
१७. नमस्काराची हाळी
१९. मांडणी करणारा
२१. चिवचिवाट
२३. नूतन
२६. मर्कट, कपि
२८. डोंगरी किल्ला, डोंगर
३०. अनुमती
३३. संकटाची छाया
३४. दिलेली खात्री
३४अ. कडक, खरखरीत
३५. बाळाची गाडी नाव वडिलांचे!
३७. जीभ
३८. श्वासाचा अवयव
३९. महाराणा प्रताप यांच्या घोड्याचे नाव
४१. अक्षराचा उच्चार बदलणारी चिन्हे
४३. वटवट, त्रास
४४. फक्त, केवळ
४५. दुधाच्या वड्या
४७. जळजळीत, अत्यंत तीव्र
४८. जन्म
४९. पर्वत
५१. दहावी रास
५४. युद्ध
५६. व्यायाम
५७. ठोक! हाण!
५८. गडकरी
५९. अफूचे बी
६२. अभिनेता
६३. हजार किलो
६५. भांड्याला पडलेला खड्डा
६६. कुस्तीची जागा
६७. नृत्यकलेची जागा
६९. लक्ष्मीचे एक नाव
७२. अखेर, शेवट
७३. दर्यावर्दी
७५. मळलेला
७६. धुणे (संस्कृत)
७८. खेडे
७९. अजगर
८०. रेष
८१. आजच्या आधीचा दिवस

### जम्बो शब्दकोडे क्र. १०४७ चे उत्तर

आडवे उत्तर
१.ढाल तलवार
४.नकलाकार ७.चाक
९.पेशा १०.सासर १२.रमा
१३.गडगडाट १६.रुबाबदार
१८.वाटचाल १९.जर
२१.जड २२.खेळ २३.पोवाडा
२५.तास २७.बळकट ३०.ओ
३१.टकटक ३२.रगड
३३.तारवटणे ३६.गीताई
३९.टक ४०.फसगत
४२.तर ४३.वातहारक
४५.माळ ४७.कानस ४९.काळ
५०.तडकाफडकी ५२.साम नावीर ५३.कनात
५४.आब ५५.अवयव
५६.पडसाद
५८.विडा उचलणे
६१.यातना ६३.वारा
६४.सरदार ६६.रुकार
६८.मालक ७०.नवलकोल
७४.रद्दड ७६.वर्ण ७७.तार
७८.कलाकार ७९.बाधणे

उभे उत्तर : १.ढालगज
२.तरंग ३.वाईट ४.नशाबाज
५.कासार ६.रस ७.चारचाकी
८.कमाल ९.पेरु ११.रवाळ
१४.डरपोक १५.डाकोडाक
१७.बडबडगीत २०.माता
२२.खेटर २४.वाटण
२६.सरबत २८.कताई
२९.पोट ३१.टवटवीत
३४.वसंत ३५.डोस
३७.तारकानाथ ३८.नकळत
४०.फळफळावळ ४१.गळकी
४३.वासर ४४.रकाना ४५.मका ४६.कसाबसा ४८.नवी
५१.डरावडराव ५३.कवच
५४.आड ५६.पदर ५७.दया
५८.विनाकरण ५९.उभा
६०.लवलवणे ६२.तरु
६३.वानर ६४.सल ६५.दादला
६७.रद्द ६९.कर्ण ७१.लता
७२.कोर ७३.सूर ७५.डबा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### धर्मांतर कायद्यानुसार दाखल गुन्हा रद्द करण्याची रिपब्लिकन पार्टीची मागणी

**पुणे : दैनिक संध्या**

महाराष्ट्रात लागू होणाऱ्या नव्या धर्मांतरविरोधी कायद्याच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील खडकी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तांना निवेदन सादर केले. हे निवेदन पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी पक्षाचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुणे शहर सचिव महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, ख्रिश्चन आघाडीचे पुणे शहर उपाध्यक्ष इशु दोरोस्वामी , शहर सचिव स्टॅनली मेथन यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनानुसार, धर्मांतर विषयक नवीन कायदा २८ ऑगस्ट २०२६ पासून राज्यात लागू होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, या कायद्यांतर्गत खडकी पोलीस ठाण्यात १८ ऑगस्ट २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्याचा दावा पक्षाने केला आहे. नवीन कायदा लागू होण्यापूर्वीच त्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याने या प्रकरणाची पडताळणी करून संबंधित गुन्हा रद्द करावा, अन्यथा पुणे शहर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात येतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. पक्षाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

### एचडीएफसी बँकेचा १.७५ अब्ज डॉलरचा परदेशी बाँड इश्यू

**पुणे : दैनिक संध्या**

■ जागतिक आर्थिक संकटानंतर भारतीय बँकेची सर्वात मोठी निधी उभारणी

एचडीएफसी बँकेने आपल्या व्यवसायाच्या वाढीसाठी परदेशी बाँडच्या माध्यमातून 1.75 अब्ज डॉलर उभारले आहेत. एचडीएफसी बँकेच्या GIFT सिटी शाखेमार्फत 1.75 अब्ज डॉलरचे वरिष्ठ असुरक्षित बाँड (सीनियर अनसिक्युअर्ड बॉन्ड) जारी करण्यात आले आहेत, अशी माहिती बँकेने नियामकांना दिलेल्या अहवालात सांगितली. जागतिक आर्थिक संकटानंतर एखाद्या भारतीय बँकेने उभारलेला हा सर्वात मोठा निधी आहे. या बाँड इश्यूला आशिया, अमेरिका आणि युरोपमधील गुंतवणूकदारांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. खासगी क्षेत्रातील या बँकेने 50 कोटी डॉलरचे बाँड 5.16 टक्के व्याजदराने (कूपन रेट) जारी केले असून, त्याची मुदत 3 वर्षांची आहे. उर्वरित 1.25 अब्ज डॉलरचे पाच वर्षांच्या मुदतीचे बाँड असून, त्यावर 5.4 टक्के व्याजदर (कूपन रेट) देण्यात येणार आहे. हे बाँड इंडिया आयएनएक्स (इंडिया इंटरनॅशनल एक्सचेंज (आयएफएससी) लिमिटेड) आणि एनएसई इंटरनॅशनल एक्सचेंज (एनएसई-आयएक्स) येथे सूचीबद्ध केले जाणार आहेत. एचडीएफसी बँकेने जूनपासून आतापर्यंत डॉलर बाँडच्या माध्यमातून 2.5 अब्ज डॉलरचा निधी उभारला आहे. जूनमध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) एफसीएनआर (FCNR) सुविधा सुरू केल्यानंतर, अशा प्रकारे सर्वाधिक निधी उभारणारी एचडीएफसी बँक आता आघाडीची कर्जदाता बँक ठरली आहे. बाँडची आकर्षक किंमत, अपेक्षेपेक्षा जास्त मागणी आणि जगभरातील गुंतवणूकदारांपर्यंत पोहोच यावरून गुंतवणूकदारांचा एचडीएफसी बँकेवरील विश्वास दिसून येतो, असे विश्लेषकांनी सांगितले. भारतीय रिझर्व्ह बँकेने लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'ला (एलआयसी) एचडीएफसी बँकेतील 9.99 टक्क्यांपर्यंतचा हिस्सा खरेदी करण्यास मंजुरी दिल्याच्या दुसऱ्याच दिवशी हा निधी उभारण्यात आला. 14 ऑगस्ट 2026 रोजी उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, एलआयसी कडे एचडीएफसी बँकेच्या एकूण भागभांडवलापैकी 4.11 टक्के हिस्सा आहे. एलआयसीने आरबीआयकडे केलेल्या अर्जाच्या आधारे ही मंजुरी देण्यात आली आहे, असे एचडीएफसी बँकेने आपल्या निवेदनात म्हटले आहे. एलआयसीव्यतिरिक्त अनेक मोठ्या ब्रोकर्सनीही एचडीएफसी बँकेच्या शेअरसाठी "बाय' (खरेदी) रेटिंग कायम ठेवले आहे. यावरून गुंतवणूकदारांचा बँकेवरील मजबूत विश्वास असल्याचे दिसून येते.

### फोक्सवॅगनने भारतासाठी नवी सब-४ मीटर कॉम्पॅक्ट एसयूव्ही जाहीर केली

**पुणे : दैनिक संध्या**

फोक्सवॅगनने आज भारतीय बाजारपेठेसाठी नवी सब-4 मीटर कॉम्पॅक्ट एसयूव्ही सादर करण्याची घोषणा केली. हा नवा मॉडेल फोक्सवॅगनसाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा असून भारतातील सर्वात मोठ्या पॅसेंजर वाहन सेगमेंटमध्ये ब्रँडची स्थिती अधिक मजबूत करेल. भारतासाठी फोक्सवॅगनची बांधिलकी अधिक दृढ करत, ही नवी एसयूव्ही 2027 मध्ये लॉन्च होणार आहे. एमक्यूबी-ए ओ -आईएन प्लॅटफॉर्मवर आधारित ही नवी एसयूव्ही फोक्सवॅगनची भारतातील सर्वात सहज उपलब्ध मॉडेल ठरणार असून भारतीय पॅसेंजर वाहन बाजारातील सर्वात मोठ्या सेगमेंटला लक्षात घेऊन तयार केली जात आहे. उच्च लोकलायझेशन आणि भारतीय बाजारपेठेतील पसंतींवर विशेष लक्ष केंद्रित करून ही नवी कॉम्पॅक्ट एसयूव्ही विकसित केली जात आहे. फोक्सवॅगनच्या जर्मन-इंजिनिअरिंग, सुरक्षा आणि बिल्ड क्वालिटी या मूलभूत मूल्यांना अनुसरून ती तयार केली जाणार आहे.

# येरवड्यातील जबरी चोरीचा छडा; सराईत गुन्हेगारांना बेड्या

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली ८७ सीसीटीव्हींची तपासणी; ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

■ **पुणे (दै. संध्या)**

कल्याणीनगर येथील ट्रम्प टॉवरसमोर एका व्यक्तीला जीवे मारण्याची धमकी देत त्याच्याकडील रोख रक्कम जबरदस्तीने लुटणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना येरवडा पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने घटनास्थळासह परिसरातील तब्बल ८७ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला. या कारवाईत आरोपींकडून फिर्यादीच्या नावाचे आधारकार्ड, १० हजार रुपये रोख आणि सुमारे ५० हजार रुपये किमतीची दुचाकी असा एकूण ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी येरवडा पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी हे ट्रम्प टॉवर, कल्याणीनगरसमोर फोनवर बोलत उभे असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना अडविले. 'रागाने का पाहतोस?' असे म्हणत आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली आणि त्यांच्या खिशातील सुमारे १५ हजार १०० रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर दोन्ही आरोपी दुचाकीवरून पसार झाले.



घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांकडून आरोपींना तातडीने जेरबंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पोलीस उपायुक्त चिलुमूला रजनिकांत आणि सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापुरकर यांनीही तपास पथकाला आवश्यक सूचना दिल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार साईनाथ म्हस्के आणि अनिल मन्हाळकर यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. घटनास्थळ आणि परिसरातील तब्बल ८७ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. आरोपींच्या हालचाली, दुचाकी आणि त्यांच्या मार्गाचा मागोवा घेण्यात आला. त्याचबरोबर तांत्रिक विश्लेषणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी हे हडपसर परिसरात राहत असल्याचे समोर आले. दोघेही हडपसर पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर गोपनीय बातमीदारांकडून माहिती घेऊन हडपसर पोलिसांच्या मदतीने दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे निखील ऊर्फ दाद्या शशिकांत कांबळे (वय २६, रा. वेताळबाबा वसाहत, गाडीतळ, हडपसर) आणि अयान नासीर शेख (वय २२, रा. गल्ली क्रमांक १९, सय्यदनगर, हडपसर) अशी आहेत.

पोलिसांनी कल्याणीनगर येथील जबरी चोरीबाबत चौकशी केली असता आरोपींनी एका व्यक्तीला जीवे मारण्याची धमकी देऊन त्याच्याकडील रोख रक्कम चोरल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. यातील निखील ऊर्फ दाद्या कांबळे हा चोरी आणि जबरी चोरीतील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर हडपसर पोलीस ठाण्यासह पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत तब्बल २७ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. तर अयान शेख याच्यावरही चार गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड करीत आहेत. तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड, पोलीस हवालदार मुकुंद कोकणे तसेच पोलीस अंमलदार शैलेश वाबळे, साईनाथ म्हस्के, अनिल मन्हाळकर, बालाजी सोगे, गणेश पालवे, संदीप जायभाय, नटराज सुतार आणि सोमनाथ गायकवाड यांनी कारवाईत सहभाग घेतला. सीसीटीव्ही तपास, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीचा प्रभावी वापर करून अल्पावधीत सराईत गुन्हेगारांना जेरबंद करण्यात येरवडा पोलिसांना यश आले असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाच्या या कामगिरीचे विशेष कौतुक होत आहे.

### गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाची कामगिरी

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त चिलुमूला रजनिकांत, सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) केशव दिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

आरोपींना येरवडा पोलीस ठाण्यात आणून दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली. त्यांच्याकडून फिर्यादीच्या नावाचे आधारकार्ड, १० हजार रुपये रोख आणि एमएच १२ वायव्ही ७७३५ क्रमांकाची सुमारे ५० हजार रुपये किमतीची दुचाकी, असा एकूण ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## दुचाकीस्वारांचे अपघात

■ **पुणे (दै. संध्या)**

मुंबई - बंगळूर महामार्गापासून हबाजी सायकर चौकादरम्यान हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे काम सुरू आहे. या मार्गावरील दुभाजकांमध्ये झाडे लावण्यासाठी माती भरण्याचे काम सुरू असून, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती पसरल्याने पावसात चिखल झाला आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसांत अनेक दुचाकीस्वार घसरून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. रवींद्रनाथ टागोर शाळेपासून मुंबई-बंगळूर महामार्गापर्यंत दुभाजकांमध्ये माती भरण्याचे काम गुरुवारी (ता. २०) रात्री सुरू करण्यात आले. कामादरम्यान माती रस्त्यावर पसरली. त्यावर पाऊस पडल्याने रस्ता चिखलमय झाला. शुक्रवारी सुमारे २० ते २५ दुचाकीस्वार घसरून पडल्याचे नागरिकांनी सांगितले. यामध्ये एका तरुणीच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली.

# एनएसयूआय व युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसह सहा जणांवर गुन्हा

## विद्यार्थीनीच्या व्हिडीओ स्टेटमेंटवरून वाद; अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्याला शिवीगाळ करून मारहाण केल्याची तक्रार

■ **पुणे (दै. संध्या)**

शिवाजीनगर येथील सीओईपी हॉस्टेलमध्ये विद्यार्थीनीचे व्हिडीओ स्टेटमेंट घेतल्याच्या प्रकरणावरून निर्माण झालेल्या वादातून एका १९ वर्षीय विद्यार्थ्याला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी पुष्कर आबनावे, भूषण राणभरे, अक्षय जैन, सौरभ आमराळे, सागर धाडवे आणि प्रथमेश आबनावे यांच्यासह त्यांच्यासोबत उपस्थित असलेल्या एनएसयूआय व युवक काँग्रेसच्या सुमारे ५० ते ६० कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मल्हार निलेश पाटील (वय १९, रा. औंध, पुणे) यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहितेतील कलम ११५(२), १८९(१), १८९(२), १९१(२), ३५१(१), ३५२ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(३), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, २१ ऑगस्ट रोजी सीओईपी हॉस्टेल, शिवाजीनगर येथे एका विद्यार्थीनीवर दबाव टाकून तिच्याकडून व्हिडीओ स्टेटमेंट घेण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकाराबाबत विचारपूस आणि चर्चा करण्यासाठी फिर्यादी मल्हार पाटील हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सहकाऱ्यांसह सीओईपी हॉस्टेलमध्ये गेले होते. यावेळी तेथे पुष्कर आबनावे, भूषण राणभरे, अक्षय जैन, सौरभ आमराळे, सागर धाडवे, प्रथमेश आबनावे आणि त्यांच्यासोबत एनएसयूआय व युवक काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घटना २१ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ ते रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान सीओईपी हॉस्टेल, शिवाजीनगर येथे घडल्याचे पोलिसांच्या नोंदीत नमूद आहे. घटनास्थळ शिवाजीनगर पोलीस ठाण्यापासून सुमारे एक किलोमीटर पूर्वेस आहे.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पुणे शहर पोलीस सहआयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त, विश्रामबाग विभागाचे सहायक पोलीस आयुक्त तसेच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी घटनास्थळी भेट दिल्याची नोंद आहे.

गुन्ह्याचा तपास अमर काळंगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शिवाजीनगर पोलीस ठाणे करीत आहेत. गुन्हा दाखल करण्याची कारवाई पोलीस उपनिरीक्षक विकास काठे यांनी केली. दरम्यान, या प्रकरणात नेमका वाद कशामुळे झाला, विद्यार्थीनीचे व्हिडीओ स्टेटमेंट कोणत्या परिस्थितीत घेण्यात आले आणि त्यानंतर झालेल्या कथित मारहाणीमध्ये नेमकी कोणाची भूमिका होती, याबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### शिवीगाळ करून मारहाण केल्याचा आरोप

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, यावेळी संबंधितांनी त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली. या घटनेनंतर त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेत कायदेशीर तक्रार दाखल केली. या प्रकरणी २२ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे ५ वाजून १३ मिनिटांनी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस ठाण्याच्या स्टेशन डायरीमध्ये नोंद क्रमांक ०९/२०२६ करण्यात आली आहे.

# विशेष परिसंवाद : सीजेपी आंदोलनात अर्बन नक्षलवाद !

## न्यायव्यवस्था, सैन्य आणि शिक्षण व्यवस्थेवरील डाव्यांचे आक्रमण उधळून लावा! – अधिवक्ता सत्येंद्र मुळे

■ **पुणे (दै. संध्या)**

लोकशाहीची मूळ संकल्पना हिंदु धर्मानेच जगाला दिली आहे. भारत हा मुक्त विचारांचा देश असतांनाही, डावी विचारधारा देशाच्या प्रगतीत सातत्याने अडथळे आणत आहे. 'अवॉर्ड वापसी गँग', 'नर्मदा बचाव आंदोलन' आणि 'शेतकरी आंदोलनां'च्या आडून न्यायव्यवस्था, सैन्य, प्रसारमाध्यमे आणि शिक्षण व्यवस्था या लोकशाहीच्या मुख्य स्तंभांवर जाणीवपूर्वक आक्रमणे केली जात आहेत. हे धोकादायक षड्यंत्र उधळून लावण्यासाठी युवा पिढीला खऱ्या इतिहासाची जाणीव करून देणे आणि वैचारिक पातळीवर सक्षम करणे गरजेचे आहे. यापुढील काळात केवळ सरकारवर अवलंबून न राहता देव, देश आणि धर्म रक्षणासाठी तरुणांनी आपले योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता सत्येंद्र मुळे यांनी केले. सनातन संस्थेच्या वतीने २० ऑगस्ट रोजी पुणे येथील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयातील गणेश सभागृहात 'सीजेपी आंदोलनात अर्बन नक्षलवाद?' या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी ३०० हून अधिक लोक उपस्थित होते. कार्यक्रमात सामाजिक व राजकीय विश्लेषक श्री. सर्वेश मेहंदळे यांनी वक्त्यांशी संवाद साधत अर्बन नक्षलवादाची विविध अंगे उलगडून दाखवली. याप्रसंगी बोलताना सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक म्हणाले, "पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी 'दिमागी नक्षलवादापासून सावध राहा' असा इशारा देऊन देशाला अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला आहे.

साम्यवाद आणि अर्बन नक्षलवाद हा भारतीयत्वाला झालेला मानसिक कर्करोग आहे. हा आजार दूर करण्यासाठी वैचारिक व बौद्धिक पातळीवर शस्त्रकर्म करावे लागेल. 'जेन-जी' पिढीसमोर साम्यवाद्यांचा खरा चेहरा आणून दाखवणे आणि समाजवाद्यांचा दुटप्पीपणा उघड करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे."

यावेळी सामाजिक व राजकीय विश्लेषक श्री. सर्वेश मेहंदळे म्हणाले, "सोनम वांगचूक यांच्या नावावर ३०० नव्हे, तर केवळ एकच पेटंट आहे; त्यांच्या




'सेकमोल' या संस्थेचा 'एफसीआरए' (FCRA) परवाना सरकारने रद्द केला आहे. सीजेपी आंदोलनाला 'आयसा' (AISA), 'एसएफआय' (SFI) आणि काही ख्रिश्चन मिशनरी संघटनांनी पाठिंबा दिला असून परकीय निधीविषयक कायद्यातील कडक बदलांना विरोध करणे हाच 'सीजेपी' आंदोलनामागे मुख्य उद्देश होता."

हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी व्हिडियो संदेशाद्वारे भूमिका मांडली.

ते म्हणाले की, गांधी हत्येनंतर देशात केवळ चार पुरोगाम्यांच्या हत्या झाल्याचा आभास निर्माण केला जातो; परंतु नक्षलवाद्यांनी मारलेल्या १४ हजारांहून अधिक निरपराधांवर हे अर्बन नक्षलवादी मौन बाळगतात. हे षड्यंत्र उधळण्यासाठी सर्वांनी कृतीशील झाले पाहिजे.

# सुरक्षित समाजासाठी पोलिस, सुरक्षा यंत्रणा व तंत्रज्ञानाचा समन्वय आवश्यक

## सहपोलिस आयुक्त संजय दराडे यांचे प्रतिपादन; 'पीएसपी-एएसआयएस कनेक्ट कॉन्क्लेव्ह'मध्ये पोलिस कर्मचाऱ्यांचा गौरव

■ **पुणे (दै. संध्या)**

"सुरक्षित आणि सक्षम कार्यस्थळे व समाज निर्माण करण्यासाठी पोलिस, सुरक्षा क्षेत्रातील व्यावसायिक, तंत्रज्ञान तज्ज्ञ, सरकारी यंत्रणा, विविध संस्था आणि नागरिकांमध्ये समन्वय आवश्यक आहे. तंत्रज्ञानासोबत मानवी बुद्धिमत्ता आणि लोककेंद्री दृष्टिकोनाची सांगड घातल्यास अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी सज्ज समाज निर्माण करता येईल," असे प्रतिपादन पुण्याचे सहपोलिस आयुक्त संजय दराडे यांनी केले.




पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स (पीएसपी) आणि एएसआयएस इंटरनॅशनल, पुणे चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सिक्युरिटी रेझिलिअन्स थ्रू कोलॅबोरेशन' या विषयावर आयोजित 'पीएसपी-एएसआयएस कनेक्ट कॉन्क्लेव्ह'मध्ये संजय दराडे बोलत होते. अमनोरा द फर्न हॉटेलमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी माजी कामगार आयुक्त डॉ. ओंकार शर्मा, पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्सचे संस्थापक मंगेश काटे व सुनील बीडलम यांच्यासह समिती सदस्य लॉयड्स दास, ज्योती मीना आणि शेखर मेहता उपस्थित होते. यावेळी गुन्हे शोध, तपास, प्रतिबंध आणि विशेष पोलिसिंगमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आठ पोलिस कर्मचाऱ्यांचा 'एक्सलन्स इन पोलिस सर्व्हिस अवॉर्ड्स २०२५-२६'ने गौरव करण्यात आला. इंटिग्रेटिंग सिक्युरिटी इनटू वर्कप्लेस एक्सपिरियन्स' या विषयावरील चर्चासत्रात सुरक्षित आणि स्मार्ट कार्यस्थळांसाठी मनुष्यबळ, तंत्रज्ञान, सुरक्षा आणि माहिती यांची सांगड घालण्यावर भर देण्यात आला. कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, स्वयंचलित प्रणाली, माहितीचे विश्लेषण, अंदाजाधारित सुरक्षा आणि स्मार्ट पायाभूत सुविधांच्या माध्यमातून भौतिक, सायबर आणि कार्यात्मक सुरक्षेला अधिक सक्षम करण्याबाबत चर्चा झाली. अंबरिश पुरोहित यांनी चर्चासत्राचे सूत्रसंचालन केले, तर रजत कबदल, दिपेश गंग्राडे, गिनी थुक्राल, शैलेश कुमार आणि हरीश कुरूप यांनी विचार मांडले.

डॉ. ओंकार शर्मा यांनी कामगार सुधारणांवर मार्गदर्शन केले. कामगार प्रशासन, औद्योगिक संबंध, अनुपालन, सामाजिक सुरक्षा, व्यावसायिक सुरक्षितता आणि कामाच्या परिस्थितीशी संबंधित विविध विषयांवर त्यांनी भाष्य केले. परिषदेच्या समारोपावेळी सुरक्षा क्षेत्रातील व्यावसायिक आणि उद्योग प्रतिनिधींमध्ये विचारांची देवाणघेवाण झाली.

एकात्मिक सुरक्षा धोरणे, तंत्रज्ञानाधारित सुरक्षा व्यवस्था, सुरक्षित कार्यस्थळे, संस्थात्मक सक्षमपणा, ज्ञानाची देवाणघेवाण आणि भविष्यासाठी सज्ज सुरक्षा नेतृत्व यावर अधिक भर देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. गुन्हे शोध, तपास, प्रतिबंध आणि विशेष पोलिसिंगमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आठ पोलिस कर्मचाऱ्यांचा 'एक्सलन्स इन पोलिस सर्व्हिस अवॉर्ड्स २०२५-२६'ने गौरव करण्यात आला.

दैनिक संध्या नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे

### राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षांनी पकडला दहा फुटांचा साप



जळगाव : दैनिक संध्या

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी आपल्या मुक्ताईनगर येथील शेतात दाखवलेल्या धाडसाची सध्या राज्यभरात चर्चा सुरू आहे. शेतात आढळलेल्या एका मोठ्या धामण सापाला त्यांनी अत्यंत कौशल्याने व सुरक्षितपणे हातात धरून, सापांबद्दलचे गैरसमज दूर करणारा एक सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. रोहिणी खडसे यांच्या मुक्ताईनगरातील फार्महाऊस परिसरात धामण साप आढळला होता. घाबरून जाऊन त्याला मारण्याऐवजी रोहिणी खडसे यांनी स्वतः पुढे होऊन त्याला सुरक्षितपणे हातात घेतले. सापांबद्दल लोकांमध्ये असलेली भीती नष्ट व्हावी आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने त्यांनी या सापाचे पर्यावरणासाठी असलेले योगदान सांगितले. "धामण हा अत्यंत चपळ असला तरी तो पूर्णपणे बिनविषारी आहे. उंदीर आणि घुशींचा खात्मा करून धान्याची होणारी प्रचंड नासाडी रोखण्यात हा साप महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे तो खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचा मित्र आहे," असे सांगत रोहिणी खडसे यांनी फक्त भीतीपोटी किंवा गैरसमजातून अशा सापांना मारू नका, असे आवाहन केले. धामण हा तपकिरी, पिवळसर, काळा तसेच हिरवट अशा विविध आकर्षक रंगछटांमध्ये आढळतो. त्याच्या अंगावरील नक्षी परिसराशी जुळणारी असल्याने तो सहजासहजी दिसत नाही. त्याच्या शरीरावर आणि शेपटीच्या भागावर काळी जाळीदार नक्षी असते. पूर्ण वाढ झालेली धामण ११ ते १२ फुटांपर्यंत लांब असू शकते. उंदीर, घुशी, बेडूक आणि सरडे हे त्याचे मुख्य खाद्य आहे. बऱ्याचदा साम्य वाटल्याने लोक भीतीपोटी धामणाला नाग समजून मारून टाकतात. मात्र धामणाकडून मानवी जीवाला कोणताही विषारी धोका नसतो. शेतात पकडलेल्या या धामण सापाला माहिती देऊन झाल्यानंतर रोहिणी खडसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरक्षितपणे जवळच्या जंगल परिसरात सोडून दिले. "परिसरात साप आढळल्यास त्याला इजा न पोहोचवता सुरक्षित अंतर ठेवावे आणि लगेचच प्रशिक्षित सर्पमित्रांना बोलवावे," असा सल्लाही त्यांनी दिला.

### शिवरायांचा एमपीएच्या जागेतील पुतळा हलवणार; गोवा हायकोर्टात ग्वाही

पणजी : दैनिक संध्या

सडा येथील मुरगाव बंदर प्राधिकरणाच्या जागेवर बसवण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सरकारी जमिनीवर हलवण्यास तत्त्वतः मान्यता असल्याचे राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्यागोवा खंडपीठासमोर स्पष्ट केले. पुतळ्याच्या पुनर्वसनासाठी योग्य जागेचा शोध सुरू असून दोन ते तीन संभाव्य जागांची पाहणी करण्यात आली आहे. मात्र त्यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही, असे सरकारने न्यायालयाला सांगितले. मुरगाव बंदर प्राधिकरणाच्या हद्दीत परवानगी न घेता हा पुतळा उभारण्यात आल्यामुळे निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर हे प्रकरण न्यायालयात पोहोचले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव पिंपळगांव सिध्दनाथ, ता. जुन्नर, जि. पुणे. येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे अशिल जितेंद्र शांतीलाल चोरडीया यांनी सांगितलेवरून जाहिर नोटीस देण्यात येते की,

गाव पिंपळगांव सिध्दनाथ ता. जुन्नर, जि. पुणे येथील १) चिराग चंद्रकांत दातखिळे, २) सुरेखा चंद्रकांत दातखिळे, ३) सुश्मिता पंकज भगत यांचे मालकीचे खाते क्र. ७३० वरील जमीन गट नं. ७/४ मधील क्षेत्र ० हे ३३.७५ आर, आकार ० रु ४८ पैसे यांसी चतुःसिमा पुर्व-रस्ता, दक्षिण-गट नं.७/४ पैकी काशिद व खंडागळे यांची मिळकत, पश्चिम-ओढा, उत्तर-गट नं. ७/४ पैकी गुलाब सदाशिव दातखिळे यांची मिळकत या मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार आमचे अशिल जितेंद्र शांतीलाल चोरडीया यांच्याबरोबर करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही, बक्षीस, गहान, दान, लिज, पोटगी, चोळी, बांगडी, खरेदी, साठेखत, करार, मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क खरेदी संदर्भात वाद, चतुःसिमाबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंन्दू कायदयाप्रमाणे अथवा प्रचलित पथे प्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरूध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क, हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीव पुर्वक सोडून दिलेले आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कोणाचेही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे
ॲडव्होकेट
मु.पो. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे.
मो. ९७३०८२८७२१.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस
ता. २१/०८/२०२६.



## जाहीर नोटीस


तमाम लोकांस विशेषतः गाव पिंपळगांव सिध्दनाथ, ता. जुन्नर, जि. पुणे. येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे अशिल जितेंद्र शांतीलाल चोरडीया यांनी सांगितलेवरून जाहिर नोटीस देण्यात येते की,

गाव पिंपळगांव सिध्दनाथ ता. जुन्नर, जि. पुणे येथील सुनिता किसन खंडागळे यांचे मालकीचे खाते क्र. ७ वरील जमीन गट नं. ७/४ मधील क्षेत्र ० हे ३३.७५ आर, आकार ० रू ४८ पैसे यांसी चतुःसिमा पुर्व-रस्ता, दक्षिण-गट नं.७/४ पैकी दत्तू राघू काशिद यांची उर्वरित मिळकत, पश्चिम ओढा, उत्तर-गट नं. ७/४ पैकी खाते नं.७३० चे क्षेत्र या मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार आमचे अशिल जितेंद्र शांतीलाल चोरडीया यांच्याबरोबर करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही, बक्षीस, गहान, दान, लिज, पोटगी, चोळी, बांगडी, खरेदी, साठेखत, करार, मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क खरेदी संदर्भात वाद, चतुःसिमाबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंन्दू कायदयाप्रमाणे अथवा प्रचलित पथे प्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरूध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क, हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कोणाचेही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे
ॲडव्होकेट
मु.पो. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे.
मो. ९७३०८२८७२१.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस
ता. २१/०८/२०२६.


# शिवलिंग धबधबा पर्यटकांचे आकर्षण



■ वाळपई (दै. संध्या)

सत्तरीत पावसाळी पर्यटन बहरले असून सत्तरीतील विविध नैसर्गिक स्थळे आणि धबधबे पावसाळी पर्यटनाचे आकर्षण ठरत आहेत. पाली सत्तरी येथील शिवलिंग धबधब्यावर मोठ्या संख्येने पर्यटक, तसेच ट्रेकर्स भेट देत असून पाली धबधबा निसर्गप्रेमींसाठी पसंतीचे ठिकाण ठरत आहे. गोवा वनविकास महामंडळाच्या अध्यक्षा तथा पर्येच्या आमदार डॉ. दिव्या राणे यांच्या या ठिकाणी विविध प्रयत्नातून साधनसुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. स्थानिकांसह राज्यभरातील निसर्गप्रेमी तसेच पर्यटकही या ठिकाणी भेट देत आहेत.

मासोर्डे सत्तरीतील शांतादुर्गा कला मंच आणि क्रीडा व युवा संचालनालयातर्फे शिवलिंग धबधब्यावर एकदिवसीय पदभ्रमण मोहिमेचे आयोजन केले होते. माशेल येथील सरकारी महाविद्यालयाचे ६० विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले होते.

कुडणे येथील महालक्ष्मी विद्यालयाचे ४० विद्यार्थी व शिक्षकांनी मोहिमेत भाग घेतला. सत्तरी मल्टिपर्पज सोसायटी, माशेल शाखेचे व्यवस्थापक तथा लोककलाकार, नाट्यकलाकार आणि निसर्गप्रेमी संतोष गावस यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी शेळ मेळावली येथील पर्यावरण कार्यकर्ते आनंद मेळेकर यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव आणि पर्यावरण यासंबंधी मार्गदर्शन केले. मेळेकर यांनी अनेक वर्षे फॉरेस्ट म्हादई वाईल्ड लाईफ सेंच्युरी बोंडला या ठिकाणी काम केले आहे. सूरज सावंत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गौरीश गावस यांनी स्वागत केले तर कुंदन गावस यांनी आभार मानले.

मासोर्डे सत्तरी येथील शांतादुर्गा कला मंच मागची ३० वर्षे कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि पर्यावरण क्षेत्रात कार्यरत आहे.

## भोळा राहिलो तर हे भाजपवाले खाऊन जातील

■ जळगाव (दै. संध्या)

जिल्हा दूध संघाच्या कार्यक्रमात शिंदे गटाचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलेल्या एका विधानाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. भर कार्यक्रमात, भाजपचे संकटमोचक मानले जाणारे मंत्री गिरीश महाजन आणि आमदार मंगेश चव्हाण व्यासपीठावर उपस्थित असतानाच, गुलाबराव पाटील यांनी, "मी भोळा नाही, भोळा राहिलो तर हे भाजपवाले मला खाऊन जातील," असे वक्तव्य केले. त्यांच्या या विधानामुळे जळगावातील महायुतीमध्ये राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

जळगाव जिल्हा दूध संघाच्या कार्यक्रमात सहकार क्षेत्रातील माजी पदाधिकारी आणि दूध संघाच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांच्या कामकाजावर भाष्य करताना मंत्री गुलाबराव पाटील यांनी त्यांच्या 'भोळेपणा'चा उल्लेख केला. त्यांच्या या विधानाचा धागा पकडत, व्यासपीठावर उपस्थित असलेले जळगाव जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांनी, "तुम्हीही भोळे आहात," अशी टिप्पणी केली.


पवार यांच्या या टिप्पणीला गुलाबराव पाटील यांनी आपल्या खास शैलीत टोलविले. ते म्हणाले, "मी भोळा नाही, आणि मला भोळा राहून चालणारही नाही. कारण, मी भोळा राहिलो तर हे भाजपवाले मला खाऊन जातील." या विधानानंतर एकच हशा पिकला. यावेळी पाटील यांनी या संस्था काँग्रेसवाल्यांनी उभ्या केल्या, ते भोळे होते. काँग्रेसवाले असूनही सभेत आमदार गुलाबराव पाटील होणार असे सांगत असत. कारण ते माणसे ओळखून काम करायचे, अशी कबुली दिली.

गुलाबराव पाटील यांनी हे वक्तव्य केले तेव्हा व्यासपीठावर भाजपचे दिग्गज नेते आणि मंत्री गिरीश महाजन, तसेच आमदार मंगेश चव्हाण उपस्थित होते. त्यांच्याच समोर आपल्या मित्रपक्षावर अशी खोचक टिप्पणी केल्याने, जळगाव जिल्ह्यातील दूध संघ आणि सहकार क्षेत्रातील सत्तासंघर्षाची किनार या विधानाला असल्याची चर्चा आहे. गुलाबराव पाटील यांचे हे विधान भाजपसोबतच्या भविष्यातील संघर्षाचे संकेत देत आहे का? की हा केवळ एक विनोदी टोला होता? यावर आता राजकीय विश्लेषक आपली मते मांडत आहेत.

## २६/११चे सूत्रधार आता भारताच्या रडारवर! हाफिज सईदसह ६ दहशतवाद्यांवर त्यांच्या 'अनुपस्थितीत' खटला

■ जळगाव (दै. संध्या)

मुंबईवर झालेल्या २६/११ च्या भीषण दहशतवादी हल्ल्यातील मुख्य सूत्रधार हाफिज सईद, झकी-उर-रहमान लखवी आणि साजिद मीर यांच्यासह सहा पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या अडचणीत आता मोठी वाढ होणार आहे. या सर्व फरार दहशतवाद्यांविरोधात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत त्यांच्या अनुपस्थितीत खटला चालवण्याची महत्त्वपूर्ण प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रकरणाचे विशेष सरकारी वकील तथा राज्यसभेचे खासदार ॲड. उज्ज्वल निकम यांनी ही महत्त्वाची माहिती २० ऑगस्ट रोजी जळगावातील आपल्या निवासस्थानी पत्रकारांशी बोलताना दिली.



न्यायालयाने या फरार आरोपींना हजर राहण्यासाठी जाहीरनामा काढला असल्याचे ॲड.निकम यांनी सांगितले. ॲड. उज्ज्वल निकम यांनी स्पष्ट केले की, हा जाहीरनामा निघाल्यानंतर ९० दिवसांच्या आत या दहशतवाद्यांविरोधातील सर्व पुरावे न्यायालयात सादर केले जातील. विशेष म्हणजे, आरोपी न्यायालयात प्रत्यक्ष हजर नसले तरीही, कायद्यानुसार त्यांना त्यांच्या बचावाची संपूर्ण संधी दिली जाईल. जर हे आरोपी पुढील तीन वर्षांच्या कालावधीतही न्यायालयासमोर हजर झाले नाहीत, तर अशा स्थितीत न्यायालयाचा निकाल अंतिम मानला जाऊ शकतो, असे कायदेशीर मत ॲड. निकम यांनी व्यक्त केले.

२६/११ च्या हल्ल्याचा मुख्य उद्देश भारताविरोधात अघोषित युद्ध छेडण्याचा होता. अजमल कसाबविरोधातील खटल्यात हा आरोप करण्यात आला होता आणि सर्वोच्च न्यायालयानेही तो मान्य केला आहे. आता हाफिज सईद, झकी-उर-रहमान लखवी, मेजर अब्दुल पाशा, अबू काफा व साजिद मीर यांच्यासह सहाही पाकिस्तानी आरोपींविरोधात डेव्हिड हेडलीच्या साक्षीसह अत्यंत भक्कम पुरावे न्यायालयासमोर सादर करण्यात आल्याचे ॲड. निकम यांनी सांगितले. तसेच, पाकिस्तान या दहशतवाद्यांना जाणीवपूर्वक संरक्षण देत असल्याचा थेट आरोपही त्यांनी केला.

या फरार आरोपींविरोधातील न्यायालयाचा जाहीरनामा आता इंटरपोलच्या माध्यमातून थेट पाकिस्तानमध्ये प्रसिद्ध करण्याबाबत केंद्र सरकारला सूचना करण्यात आली असून, पुढील काही दिवसांतच यासंदर्भातील अहवाल अपेक्षित आहे. एकदा का या प्रकरणात न्यायालयाचा निकाल आला, की त्याच्या आधारे दहशतवाद्यांना पाठीशी घालणाऱ्या पाकिस्तानवर जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय दबाव आणण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास ॲड. निकम यांनी व्यक्त केला.

# भाजपच्या कार्यालयाचे स्वप्न साकार, इमारत पुढील १०० वर्षे टिकेल

■ पणजी (दै. संध्या)

'भाजपसाठी स्वतःचे कार्यालय असावे, हे माझे अनेक वर्षापासूनचे स्वप्न होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या योगदानातून या कार्यालयाची इमारत उभारण्यात आली असून, ही इमारत पुढील १०० वर्षे टिकेल,' असा विश्वास मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केला. कदंब पठारावर महामार्गालगत बांधण्यात आलेल्या मोठ्या कार्यालयात गुरुवारी ध्वजारोहण आणि वास्तूपूजा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांच्या हस्ते करण्यात आली.

या भवनाच्या वास्तू पूजेवेळी सभापती डॉ. गणेश गावकर, आरोग्य मंत्री विश्वजीत राणे, केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक, राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे, मगोचे नेते व मंत्री सुदिन ढवळीकर, दीपक ढवळीकर, माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांसह भाजपचे मंत्री, आमदार व ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, 'कार्यालयाच्या उद्घाटनास उपस्थित राहता आल्याचा आनंद होत आहे. या कार्यालयातून भाजपचे कार्यकर्ते राज्याच्या विकासासाठी काम करतील. या कार्यालयाचे अधिकृत उद्घाटन येत्या ६ सप्टेंबर रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.' दामू नाईक म्हणाले, 'भाजपच्या कार्यकर्त्यांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. पक्षासाठी योगदान दिलेल्या सर्व नेते, कार्यकर्त्यांचे हे हक्काचे स्थान आहे. गेली



अनेक वर्षे राज्यात भाजप सत्तेवर आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याला वाटत होते, पक्षाचे स्वतःचे असे भवन असावे. आज ते स्वप्न पूर्ण झाले आहे. प्रदेशाध्यक्ष या नात्याने मला या भवनाची पूजा करण्याचा मान मिळाला, याचा मला आनंद वाटतो. हे कार्यालय सुसज्ज अशा सेवांनी भरलेले आहे. सर्वांसाठी खास जागा आहे. या भवनात सर्व आधुनिक सोयी ठेवल्या आहेत.

'खासदार तानावडे म्हणाले, 'मी अध्यक्ष असताना ही जागा घेतली व या कार्यालयाची पायाभरणी केली, याचा आनंद वाटतो. सबंध देशभर भाजपची स्वतःची कार्यालये आहेत. ही आमच्या नेत्यांप्रमाणे सर्व कार्यकर्त्यांचे स्वप्न होते की स्वतःचे असे भवन असावे. ते स्वप्न साकार झाले आहे. या ठिकाणी सर्व सुविधा असणार आहेत.' आरोग्यमंत्री विश्वजीत राणे म्हणाले, 'आमच्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वप्न साकार झाले आहे.' पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनामुळे हे भवन झाले आहे.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६
दैनिक संध्या



## थोडक्यात पण महत्वाचे



### काळेवाडी-रहाटणी परिसरातील रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य

**पिंपरी : दैनिक संध्या**

काळेवाडी, रहाटणी, विजयनगर, तापकीरनगर तसेच, भारतमाता चौक, नढेनगर, कोकणेनगर, पाचपीर चौक, आदर्शनगर, ज्योतिबानगर परिसरातील रस्त्यांवर पावसामुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. यि रस्त्यांची तातडीने दुरुस्ती न झाल्यास खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा माजी विरोधी पक्ष नेते मच्छिंद्र तापकीर यांनी दिला आहे. रस्त्यांवरील मोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. अनेक नागरिक जखमी झाले आहेत. शालेय विद्यार्थ्यांनाही खड्ड्यांमधून वाट काढत शाळेत जावे लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी व दुचाकीस्वारांना या रस्त्यांवरून प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने महापालिकेने विलंब न करता खड्डे बुजवून रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी तक्रार माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तापकीर यांनी केली आहे. रस्त्यांची तातडीने दुरुस्ती न झाल्यास खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यांनी दिला आहे.

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६'चे भव्य आयोजन

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहरातील सांस्कृतिक चळवळीला अधिक व्यापक स्वरूप देणे, स्थानिक कलाकारांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच शहराच्या कला, साहित्य आणि सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात दि. १८ ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत तीन दिवसीय महोत्सव संपन्न होणार असल्याची माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली. महोत्सवाच्या आयोजनाबाबत आयोजित पत्रकार परिषदेत महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महोत्सवाच्या स्वरूपाची व नियोजित कार्यक्रमांची माहिती दिली. पिंपरी-चिंचवड शहराने औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रासोबतच कला, साहित्य, नाट्य, संगीत, क्रीडा आणि लोकसंस्कृतीच्या क्षेत्रातही स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शहरातील या सांस्कृतिक ऊर्जेला एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देणे, विविध पिढ्यांना सांस्कृतिक उपक्रमांशी जोडणे आणि गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा अधिक दृढ करणे हा महोत्सवाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. तीन दिवसीय महोत्सवात सर्व वयोगटांतील नागरिकांचा सहभाग राहील, अशा पद्धतीने विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. नाट्यरसिकांसाठी दर्जेदार व लोकप्रिय व्यावसायिक मराठी नाटकांचे विशेष प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील नामवंत गायक-कलाकारांच्या सहभागातून भावगीत, नाट्यगीत, भक्तिगीत तसेच लोकप्रिय मराठी-हिंदी गीतांचा समावेश असलेली संगीत मैफल आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि लोकपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक लावणीचे सादरीकरण, तरुणाईसाठी आधुनिक संगीत आणि फ्यूजनचा समावेश असलेला रॉक बँड परफॉर्मन्स तसेच विविध सामाजिक विषय, हास्य-विनोद आणि समकालीन आशय मांडणाऱ्या नामवंत कवींचे राज्यस्तरीय कवी संमेलन हे महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. महिलांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी पाककला स्पर्धा आणि फॅशन शो आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्राच्या शौर्यपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या लाठी-काठी, दांडपट्टा व अन्य मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके देखील सादर करण्यात येणार आहेत. बालकलाकारांच्या अभिनय व सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी बालनाट्य व बाल एकांकिका स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच पारंपरिक वस्तू, हस्तकला, स्थानिक कलाकुसर आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'संस्कृती जत्रा' व प्रदर्शनाचे आयोजनही महोत्सवाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे.

### भाजप ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी शितल शिंदे

**पिंपरी : दैनिक संध्या**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, नगरसेवक शितल शिंदे यांची महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, तर मनोज ब्राह्मणकर यांची महाराष्ट्र प्रदेश कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमुळे पिंपरी-चिंचवडसह राज्यातील भाजप ओबीसी मोर्चाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ओबीसी मोर्चाचे प्रदेश प्रभारी योगेश सागर आणि प्रदेशाध्यक्ष आ. योगेश टिळेकर यांच्या नेतृत्वाखाली नव्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये विविध पदांवर नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असून, शितल शिंदे आणि मनोज ब्राह्मणकर यांच्यावर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. नगरसेवक शितल शिंदे यांनी पक्ष संघटन, सामाजिक कार्य आणि ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने काम केले आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ प्रदेश पातळीवरील संघटन वाढीसाठी होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. तसेच मनोज ब्राह्मणकर यांनी पक्षनिष्ठा आणि संघटनात्मक कार्यातून आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, कोषाध्यक्ष म्हणून आर्थिक नियोजन आणि संघटनात्मक बळकटीसाठी ते महत्त्वाची भूमिका बजावतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या नियुक्तीबद्दल भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांकडून शितल शिंदे व मनोज ब्राह्मणकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस आयुक्तांकडे निवेदन

■ पिंपरी (दै. संध्या)

वाकड, हिंजवडी, ताथवडे आणि पुनावळे परिसरातील दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करत आज पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त यांना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले.

हिंजवडी आयटी पार्कमधील हजारो कर्मचारी, वाढती लोकसंख्या, राष्ट्रीय महामार्गावरील मोठ्या प्रमाणातील वाहतूक, विविध ठिकाणी सुरू असलेली रस्त्यांची विकासकामे तसेच वाढत्या वाहनसंख्येमुळे या संपूर्ण परिसरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत नागरिकांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून त्यामध्ये नागरिकांचा वेळ आणि इंधनाचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे.

विशेषतः रुग्णवाहिका, शालेय वाहने तसेच अत्यावश्यक सेवांच्या वाहनांनाही वाहतूक कोंडीचा फटका बसत असून आपत्कालीन परिस्थितीत गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर वाकड, हिंजवडी, ताथवडे आणि पुनावळे परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी किमान ३० ते ५० अतिरिक्त पोलीस कर्मचारी तसेच आवश्यक संख्येने ट्रॅफिक वॉर्डन नियुक्त करण्यात यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास प्रमुख चौक, जंक्शन, सर्व्हिस रोड, शाळा व आयटी परिसरातील वाहतूक अधिक प्रभावीपणे नियंत्रित करता येईल. तसेच गर्दीच्या वेळेत वाहतूक नियमन आणि पर्यायी मार्गांचे व्यवस्थापन अधिक सक्षमपणे करता येणार आहे. यावेळी नगरसेविका श्रुतीताई वाकडकर, भारतीय जनता पार्टीचे पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष रामभाऊ वाकडकर, सहकारी नगरसेविका रेश्माताई भुजबळ आणि चेतनभाऊ भुजबळ उपस्थित होते.

वाकड, हिंजवडी, ताथवडे आणि पुनावळे परिसरातील नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या या गंभीर प्रश्नाचे कायमस्वरूपी निराकरण होण्यासाठी प्रशासनाच्या विविध विभागांशी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून, नागरिकांच्या हितासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, असे यावेळी सांगण्यात आले.



# निगडी-चाकण मेट्रोसाठी भोसरीचा उड्डाण पूल पाडणार; १२,९३७ कोटींच्या सुधारित डीपीआरला वेग

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरात निगडी ते चाकण असा मेट्रो मार्ग तयार करण्यात येणार आहे. तसेच, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने (एनएचएआय) नाशिक फाटा ते खेड असा 30 किलोमीटर लांबीचा आठ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर बांधण्यात येणार आहे. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने उभारलेला भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाण पूल पाडण्यात येणार आहे, अशी माहिती सर्वसाधारण सभेत देण्यात आली.

शहरात पिंपरी ते दापोडी या मार्गावर सध्या मेट्रो धावत आहे. पिंपरी ते निगडी विस्तारीत मार्गाचे काम सुरू आहे. ते काम 50 टक्क्यांहून अधिक झाले आहे. शहराची गरज लक्षात घेऊन निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक ते चाकण असा 45.295 किलोमीटर अंतराच्या मेट्रो मार्ग तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे शहराचा उर्वरित संपूर्ण भाग मेट्रोने जोडला जाणार आहे. तसेच, हिंजवडी आयटी पार्क, पिंपरी-चिंचवड आणि चाकण एमआयडीसी मेट्रोने जोडली जाणार आहे. या मार्गाचा तब्बल 12 हजार 937 कोटी 23 लाख रुपये खर्चाच्या सुधारित डीपीआरला महामेट्रोने तयार करून पालिकेकडे फेब्रुवारी 2026 ला सादर केला आहे. त्या संदर्भात महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी पालिकेच्या सर्वसाधारण सभेत सादरीकरण केले. मेट्रोच्या डीपीआरबाबत माहिती देताना महामेट्रोचे संचालक अतुल गाडगीळ यांनी सांगितले की, महामेट्रोने सुधारित डीपीआर पालिकेस सादर केला आहे. त्यावर लोकप्रतिनिधींसमोर 27 जुलैला सादरीकरण करण्यात आले. सुधारित डीपीआर 47.295 किलोमीटर अंतराचा आहे. त्यात पिंपरी-चिंचवड शहरात एकूण 28 आणि चाकण नगरपालिका हद्दीत एकूण 6 असे एकूण 34 मेट्रो स्टेशन असणार आहेत. त्यात महापालिकेचा हिस्सा एकूण 330 कोटी रुपयांचे असणार आहे. तर, नाशिक फाटा ते खेड या मार्गावर एनएचएआयकडून आठ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर निर्माण केला जाणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाने 7 हजार 827 कोटी रुपयांचा निधीची तरतूद केली आहे. त्यासाठी भूसंपादन अंतिम टप्प्यात आले आहे. त्या कामासाठी भोसरी येथील उड्डाण पूल पाडण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे मेट्रोऐवजी एनएचएआयकडून भोसरीचा पूल पाडला जाणार हे स्पष्ट झाले आहे.

भोसरी येथील उड्डाण पूल पाडण्यास महापौर रवी लांडगे यांचा विरोध आहे. पूल ठेवून पर्यायी बाबीचा विचार करावा, अशी सूचना त्यांनी केली होती. मात्र, पूल पाडण्यात येणार असल्याचे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्याबाबत योग्य तो तोडगा काढला जाईल. सुधारित डीपीआरबाबत नगरसेवकांसमोर पुन्हा सादरीकरण केले जाणार आहे. त्यात उपसूचनेनुसार डीपीआरमध्ये बदल केला जाईल, असे महापौर रवी लांडगे यांनी दावा केला आहे. नवा मार्ग निगडीतील भक्ती-शक्ती येथून ट्रान्सपोर्टनगर, गणेशनगर, मुकाई चौक, रावेत, पुनावळे गाव, पुनावळे, ताथवडे गाव, ताथवडे, भुमकर चौक, भुजबळ चौक वाकडपर्यंत जाईल.

# जुनी सांगवीत 'वॉटर एटीएम'चा गोरखधंदा

■ पिंपरी (दै. संध्या)

शहरातील जुन्या सांगवी परिसरात सध्या आरोग्याचा मोठा प्रश्न गंभीर बनला आहे. एकीकडे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या गलथान कारभारामुळे सांगवीकरांना आधीच अपुऱ्या आणि गढूळ पाण्याचा सामना करावा लागतो. नळाला तासनतास पाणी येत नाही आणि पाणी आले तरी ते गढूळ व पिण्यायोग्य नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. अशा हलाखीच्या परिस्थितीत नागरिक शुद्ध पाण्याच्या अपेक्षेने वॉटर एटीएमचा आधार घेत आहेत; परंतु या वॉटर एटीएमचे पाणी नागरिकांच्या आरोग्यासाठी खरोखरच योग्य आहे का? यावर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जुन्या सांगवीत केवळ वॉटर एटीएमच्या नावाखाली नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे समोर आले आहे. या परिसरामध्ये तब्बल सात वॉटर एटीएम सुरू आहेत. मात्र, या एटीएममधून मिळणारे पाणी खरोखरच पिण्यायोग्य आहे का? या संपूर्ण प्रकाराकडे अन्न व औषध प्रशासन आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेचे पाणीपुरवठा विभाग पूर्णपणे दुर्लक्ष करत असून, त्यांचा या गंभीर प्रकरणाकडे साफ कानाडोळा असल्याचे स्पष्ट होत आहे.

सामान्यतः वॉटर एटीएमसाठी शुद्ध आणि योग्य पाणी वापरणे बंधनकारक असते. बोअरिंगच्या पाण्याचे योग्य पद्धतीने शुध्दीकरण करण्यासाठी ३५ ते ४० लाखांचा मोठा प्लँट लागतो; कारण बोअरिंगच्या पाण्याला दोन ते तीन वेळा फिल्टर करावे लागते.

मात्र, येथील एटीएममध्ये सर्रास बोरिंगचे दूषित पाणी वापरले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अनधिकृत प्रकारात आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे, काही दुकानदार ५० रुपयांचा ब्रँडेड जार विकत घेण्याऐवजी स्वतःच्या आर्थिक नफ्यासाठी या स्वस्त वॉटर एटीएममधून २० रुपयांना जार भरून घेऊन जातात. हेच असुरक्षित पाणी ते आपल्या दुकानात ग्राहकांना तब्बल ५० रुपयांना विकत असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ खेळला जात आहे.

# शुक्रवारी आयईईई आयसीसीयूबीईए आंतरराष्ट्रीय परिषद

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या वतीने दहावी आयईईई इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन कम्प्युटिंग, कम्युनिकेशन, कंट्रोल अँड ऑटोमेशन या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी, (दि.२१) सकाळी १० वाजता, परिषदेचे उद्घाटन बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स, पिलानीचे कुलगुरू डॉ. व्ही. रामगोपाल राव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी स्पेस एप्लीकेशन्स सेंटर, अहमदाबादचे माजी संचालक डॉ. निलेश देसाई, आयईईई पुणे सेक्शनचे प्रतिनिधी डॉ. मंदार भवाळकर आदी उपस्थित राहणार आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी आणि उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या दोन दिवसीय परिषदेची 'टेक फॉर गुड : बिल्डिंग अ बेटर डिजिटल वर्ल्ड' ही मध्यवर्ती संकल्पना आहे. परिषदेला आयईईई पुणे सेक्शनचे तांत्रिक प्रायोजकत्व आहे. संशोधन निबंधांचे सादरीकरण, तज्ज्ञांची कीनोट व्याख्याने आणि ज्ञानाची देवाणघेवाण होणार आहे. डॉ. अर्चना शर्मा आणि डॉ. श्रीनिवास कुलकर्णी यांचे व्याख्यान होणार आहे. उत्कृष्ट संशोधनासाठी 'बेस्ट पेपर अवॉर्ड' प्रदान करण्यात येणार आहे. समारोप केंद्रीय मंत्रालय इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी वरिष्ठ अधिकारी डॉ. सुधीर कुमार मारवा यांच्या उपस्थितीत होणार आहे. पीसीसीओईच्या माध्यमातून जागतिक दर्जाच्या संशोधनाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, विद्यार्थी, संशोधक, शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्याला चालना देणे तसेच भारताच्या संशोधन क्षमतेला जागतिक व्यासपीठाशी जोडणे, हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

# पवन मावळात पिकांवर दुहेरी संकट; मररोगासह लष्करी अळीचा प्रादुर्भाव वाढला

■ मावळ(दै. संध्या)

पवन मावळ परिसरातील अनेक गावांमध्ये भात, सोयाबीन आणि मका पिकावर मररोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. यंदाच्या हंगामात सुरुवातीला झालेला पाऊस, त्यानंतर आर्द्रता आणि सततचे ढगाळ वातावरण यामुळे रोगाच्या वाढीस पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी झाडे अचानक कोमेजणे, पाने पिवळी पडणे तसेच काही ठिकाणी संपूर्ण झाड सुकून जाण्याच्या घटना वाढल्या आहेत.

कृषी तज्ज्ञांच्या माहितीनुसार, मररोग हा प्रामुख्याने बुरशीजन्य रोग असून, तो मुळांद्वारे पिकामध्ये प्रवेश करतो. रोगग्रस्त झाडांमध्ये अन्नद्रव्ये व पाण्याचा पुरवठा खंडित होत असल्याने झाडाची वाढ खुंटते आणि उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. सुरुवातीला काही झाडांमध्ये रोगाची लक्षणे दिसून येतात. मात्र, वेळीच नियंत्रण न आणल्यास हा रोग संपूर्ण शेतात वेगाने पसरू शकतो. सध्या मका पीकवाढीच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर असल्याने रोगाचा



प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. रोगग्रस्त झाडे आढळून येताच ती त्वरित उपटून नष्ट करावीत, असा सल्ला कृषी विभागाकडून देण्यात आला आहे. परिसरातील कोवळ्या मका पिकांवर सध्या लष्करी अळीचा मोठा प्रादुर्भाव झाला आहे. महागड्या कीटकनाशकांची फवारणी करूनही अळीवर नियंत्रण मिळवणे कठीण जात असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. पिकांच्या नुकसानीमुळे यंदा उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त होत आहे. यंदा जून महिना कोरडा गेल्याने पेरण्या लांबणीवर पडल्या होत्या. जुलैच्या पहिल्या आठवड्यातील पावसानंतर शेतकऱ्यांनी पेरणी केली. मात्र, मागील काही दिवसांतील उष्ण व दमट वातावरणात लष्करी अळीने डोके वर काढले आहे. ही अळी पिकाच्या पोंग्यात आणि झाडाच्या मध्यभागी लपून राहून कोवळी पाने कुरतडत आहे, ज्यामुळे पिकाची वाढ खुंटली आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले, की आम्ही विविध औषधांची फवारणी केली, तरीही अळी पूर्णपणे नष्ट होत नाही. आर्थिक खर्च वाढतोय पण पीक वाचत नाहीये. कृषी विभागाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून मार्गदर्शन करण्याची गरज आहे. अळी पोंग्यात आढळल्यास क्लोरोपायरीफॉस १८.५ एससी किंवा इमामेक्टिन बेन्झोएटची फवारणी करावी. अळीचे प्रमाण जास्त असल्यास २० लिटर पाण्यात १४ ग्रॅम औषध घ्यावे. तसेच, निंबोळी अर्काचा वापर केल्यास अळीच्या नियंत्रणास मदत होते, असे कृषी तज्ज्ञांनी सांगितले.

# विरोधकांना निवडणुकीच्या वेळी लाडकी बहीण आठवली - खा. राऊत

■ पिंपरी (दै. संध्या)

कलाकारांना, क्रीडापटूंना, सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना राजाश्रय मिळाला पाहिजे. हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी नेहमीच अशा व्यक्तींचा सन्मान केला आहे. रक्तदान आणि आरोग्य शिबिरांची चळवळ बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून उद्धव ठाकरे जबाबदारीने काम करीत आहेत. कोरोना काळात अवघे जग ठप्प झाले असताना त्यांनी स्वतःच्या कुटुंबाप्रमाणे महाराष्ट्रातील जनतेची जबाबदारी घेतली होती. याची दखल सर्वोच्च न्यायालयाने देखील घेतली आहे. त्यांच्या नावे दिलेले पुरस्कार हा सन्मान आहे. जिथे संकट तिथे शिवसेना अशा पद्धतीने सर्वसामान्यांचे प्रश्न घेऊन शिवसेना काम करीत आहे. शिवसेनेने अगोदर काम केले आणि मग मतं मागितली. तर विरोधकांना निवडणुकीच्या वेळी लाडकी बहीण आठवली अशी बोचरी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केली.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेच्या वतीने "उद्धव श्री पुरस्कार २०२६" चे वितरण खासदार संजय राऊत आणि माजी खासदार विनायक राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी खा. विनायक राऊत यांनी सांगितले की, सध्या राजकारणात पुढे पुढे करणाऱ्यांचे दिवस आहेत. प्रामाणिक माणसांच्या पदरी उपेक्षा पडत आहे, परंतु शिवसेनेच्या माध्यमातून पुरस्कार देऊन




सन्मान केला जात आहे. महाराष्ट्रातील ३६ हजार उद्योग बंद पडले आहेत हे महाराष्ट्राला लाजिरवाने आहे.

उद्योजकांना दिलासा देण्या ऐवजी त्रास दिला जात आहे. महाराष्ट्रात त्यांच्यावर सर्वात जास्त टॅक्स लावला आहे. या पुरस्कार सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन करणाऱ्या चेतन पवार यांच्यावर उद्धव ठाकरे यांचा पूर्ण विश्वास आहे असे माजी खा. विनायक राऊत यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड शहर प्रमुख चेतन पवार यांनी स्वागत, प्रास्ताविक करताना सांगितले की, हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या सामाजिक कार्याचा सन्मान आहे. यातील अनेकांनी कोरोना सारख्या जोखीम काळात देखील पुढे येऊन आपले कर्तव्य बजावले आहे.

डॉ. संतोष लाटकर (वैद्यकीय), डॉ. रोहन काटे (वैद्यकीय), प्रा. तुकाराम पाटील (साहित्यिक), काशिनाथ नखाते (कामगार), प्रीती वैद्य (सामाजिक), चांद पाशा अहमद हुसेन तांबोळी (क्रीडा) पै. योगेश्वर तापकीर (क्रीडा) भाग्यश्री मोरे (सामाजिक), रामदास काटे (कृषी) आणि डॉ. संजीव कुमार पाटील (कला), शौर्या भरणे (क्रीडा), रियाज शेख (कुस्ती) आणि भाग्यश्री मोरे (दिव्यांगांसाठी कार्य) यांचा "उद्धव श्री पुरस्कार २०२६" सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वीज रोहीत्र(डिपी) ४८ तासात बसवले कंद यांच्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

पेरणे (ता.हवेली) येथे विजय रणस्तंभ जवळील शेतीत दीड महिन्यांपासून बंद असलेले रोहित (डिपी) ही राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे वरिष्ठ सरचिटणीस तथा वीज वितरण नियत्रंण समितीचे जिल्हा सदस्य प्रदिप वसंत कंद यांच्या तात्काळ पाठपुराव्यामुळे वीज वितरण खात्याने दखल घेऊन अवघ्या ४८ तासांत बसवले. त्यामुळे शेतकऱ्यांचा वीजेचा मोठा प्रश्न मार्गी लागल्याने पेरणे गावातील शेतकऱ्यांनी कंद यांचे आभार व्यक्त केले. अशी माहिती सुरेश वाळके यांनी दिली. भीमा नदीच्या किनारी भागात वसलेला पेरणे पंचकृषी परिसर हा शेतीप्रधान आहे. हिरवाई शेतीने नटलेला हा परिसर ओळखला जातो. मात्र पेरणे फाटा जवळ असलेल्या विजय रणस्तंभ शेजारील शेतीत असलेले रोहित्र (डीपी) हे गेले दीड महिन्यांपासून बंद होते त्यामुळे येथील स्थानिक शेतकऱ्यांसमोर वीजेचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. वीजे अभावी शेतकऱ्यांची शेतातील कामे रखडली होती. त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले होते. हा वीजेचा प्रश्न,समस्या स्थानिक शेतकरी सुरेश वाळके व इतरत्र शेतकऱ्यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश वरिष्ठ सरचिटणीस प्रदिप वसंत कंद यांना कळविल्यानंतर कंद यांनी तात्काळ सबंधित वीज खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून हे रोहित्र (डीपी) बसविण्याच्या सूचना देऊन पाठपुरावा केला. त्यामुळे दीड महिन्यांपासून बंद असलेले रोहित्र (डीपी) ही येथे अवघ्या ४८ तासात सबंधित वीज खात्याने बसविले. याप्रसंगी वायरमन पाटील, शेतकरी सूरेश लहानू वाळके, शरद काळूराम वाळके, खंडू बाबूराव गावडे, खरेदी विक्री संघाचे संचालक दादासाहेब माने, कैलास बबन वाळके, आप्पासाहेब शेडकर, अदिनाथ रोहिदास वाळके, आदी शेतकरी उपस्थित होते.



### काळदरीत शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**जेजुरी: दैनिक संध्या**

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत २१० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी सासवड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय पथकाने माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करीत त्यांना संदर्भित आजारासाठी पुढील उपचाराचा सल्ला दिला आणि सर्दी, खोकला व ताप असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत औषधे देण्यात आली. मुलींचे हिमोग्लोबिन तपासणी करण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या तसेच रक्ताचे प्रमाण कमी असलेल्या विद्यार्थ्यांना औषधोपचार देण्यात आला. यावेळी आरोग्य अधिकारी यांनी वैयक्तिक स्वच्छता, पौष्टिक व सकस आहार, व्यायाम, पावसाळ्यात पसरणारे डेंग्यू मलेरिया, चिकणगुणिया यांसारखे आजार, त्यांच्या निराकरणासाठी घ्यावयाची काळजी आणि पुरेसे पाणी पिण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी त्यांच्या समवेत सासवड ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. किर्ती गोसावी, औषध निर्मात्या सौ. माधवी राऊत व परिचारिका सौ. सिमा भापकर उपस्थित होते. तसेच यावेळी वैद्यकीय पथकाने काळदरी केंद्रातील सर्व अंगणवाड्या व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळदरी,बहिरवाडी, पिसाळवाडी, कोंडकेवाडी, बांदलवाडी, हुंबेवस्ती, खराडवाडी, चिकणेवाडी, धनकवडी येथील इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या ९६ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करुन मोफत औषधोपचार पुरवण्यात आले. या आरोग्य तपासणीचे नियोजन प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांनी केले होते तर तपासणीच्या यशस्वीतेसाठी प्रा संतोष नवले, पर्यवेक्षक सुनील घोडके, पंडित चेंडके, संजय भिंताडे, बाळू पोमणे, शिवाजी गोडसे, सौ. सुनंदा टकले, सौ. कविता शेलार, पुरंदर तालुका शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे मा अध्यक्ष पांडुरंग जाधव, ग्रामपंचायत सदस्य अशोक भगत आणि संतोष दोडके अंगणवाडी सेविका, सर्व प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक - शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.



### 'विद्यार्थिनींच्या आरोग्याला प्राधान्य; शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणार'

**आळंदी : दैनिक संध्या**

विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेला प्राधान्य देत शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषद प्रयत्नशील राहील, असे नगरसेविका तथा यात्रा विकास समितीच्या सभापती पूजा घुंडरे यांनी सांगितले. आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक १ येथे विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन बसविण्यात आले. श्री संत ज्ञानेश्वर मंदिर समितीच्या ॲडव्होकेट रोहिणीताई पवार यांनी 'हर घर रोजगार फाउंडेशन'च्या माध्यमातून स्वखर्चातून हे मशीन उपलब्ध करून दिले. उपनगराध्यक्षा सुजाताई तापकीर, नगरसेविका पूजा घुंडरे व फाउंडेशनच्या संस्थापक शिल्पा जाधव यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी नगरसेविका पूजा घुंडरे यांनी मासिक पाळीच्या काळात स्वच्छता व आरोग्याची योग्य काळजी घेण्याचे आवाहन केले. आरोग्याशी संबंधित समस्या असल्यास विद्यार्थिनींनी संकोच न करता पालक व शिक्षकांशी मोकळेपणाने संवाद साधावा, असेही त्यांनी सांगितले. फाउंडेशनच्या शिल्पा जाधव व सुरेखा पिंपळकर यांनी मशीनचा योग्य वापर, सॅनिटरी पॅडची विल्हेवाट आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

# पीएमपीएमएल बससेवा सुरू झाल्याने नागरिकांची गैरसोय दूर

**■ पुरंदर (दै. संध्या)**

कुंभारवळण, एखतपूर, खानवडी, वाळुंज आणि बेलसर परिसरातील नागरिकांसाठी पीएमपीएमएल बससेवा सुरू झाल्याने गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावत असलेली सार्वजनिक वाहतुकीची गैरसोय आता मोठ्या प्रमाणात दूर होण्यास मदत झाली आहे.



ग्रामीण भागाला शहराशी जोडणारी सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार, शेतकरी तसेच दैनंदिन कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या परिसरातील नागरिकांना शिक्षण, नोकरी, व्यवसाय, शेतीविषयक कामे, बाजारपेठ, दवाखाने, बँका तसेच विविध शासकीय व खासगी कार्यालयीन कामांसाठी नियमितपणे शहराकडे ये-जा करावी लागते. मात्र यापूर्वी पुरेशी सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नसल्याने नागरिकांना खासगी वाहने किंवा उपलब्ध असलेल्या इतर प्रवासाच्या साधनांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे प्रवासाचा खर्च वाढण्याबरोबरच वेळेचीही मोठी गैरसोय होत होती. विशेषतः शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बससेवेअभावी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेक विद्यार्थ्यांना दुचाकी, खासगी वाहन किंवा इतर वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. पीएमपीएमएलची बससेवा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना सुरक्षित, नियमित आणि तुलनेने कमी खर्चात प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठीही ही बससेवा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. बाजारपेठ, दवाखाना, बँक, शासकीय कार्यालये तसेच इतर आवश्यक कामांसाठी शहरात जाणाऱ्या नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा फायदा होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अनेक अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे. बससेवेमुळे कुंभारवळण, एखतपूर, खानवडी, वाळुंज आणि बेलसर या गावांचा शहराशी संपर्क अधिक सुलभ होणार असून, या भागातील आर्थिक व सामाजिक व्यवहारांनाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे. शेतकऱ्यांनाही बाजारपेठेत जाण्यासाठी तसेच शेतीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी या वाहतूक सुविधेचा फायदा होणार आहे.

**अनेक वर्षांची गैरसोय दूर होण्यास सुरुवात**

पीएमपीएमएल बससेवा सुरू झाल्याने कुंभारवळण, एखतपूर, खानवडी, वाळुंज आणि बेलसर परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांची सार्वजनिक वाहतुकीची गैरसोय दूर होण्यास सुरुवात झाली आहे. आता ही सेवा नियमित, वेळेवर आणि कायमस्वरूपी उपलब्ध राहावी, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, पीएमपीएमएल बससेवा सुरू झाल्याचे नागरिकांनी स्वागत केले असून, ही सेवा केवळ काही दिवस किंवा प्रायोगिक स्वरूपात न ठेवता नियमित आणि कायमस्वरूपी सुरू ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन भविष्यात बसच्या फेऱ्यांमध्ये वाढ करावी, योग्य वेळापत्रक निश्चित करावे तसेच सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत अतिरिक्त फेऱ्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच या मार्गावरील प्रवाशांची संख्या वाढल्यास पीएमपीएमएल प्रशासनाने त्याचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार आणखी बस उपलब्ध करून द्याव्यात. ग्रामीण भागातील नागरिकांना शहराशी जोडण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## चाकणला महामार्गावर नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई

**■ चाकण (दै. संध्या)**

पिंपरी - चिंचवड वाहतूक पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. पुणे - नाशिक व चाकण - शिक्रापूर महामार्गावर नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्याचे हत्यार उपसण्यात आले आहे.

पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेमार्फत चाकण हद्दीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. पुणे - नाशिक महामार्ग तसेच चाकण परिसरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर ही धडक कारवाई करण्यात आली आहे. कर्णकर्कश व फटाक्यांसारखा आवाज करणारे सायलेन्सर सडक सख्यांहऱ्यांवर कारवाई करण्यात आली. भरधाव वेगाने वाहने चालवणाऱ्या तसेच फटाक्यांसारखा व कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट व इतर दुचाकी अशा एकूण ५५ वाहनांवर थेट कारवाई करून त्यांचे बेकायदेशीर सायलेन्सर जागीच काढून जप्त करण्यात आले.

विद्यार्थी व विनापरवाना वाहन चालविणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यात आली. शाळा - महाविद्यालय परिसर व महामार्गावर विनापरवाना, ड्रायव्हिंग लायसन्स नसलेले वाहने व महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी वाहने यांच्यावर कारवाई करण्यात आली. महामार्गावर बेशिस्तपणे वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या २१ बसेस, ३७ इतर वाहने आणि १३ रिक्षांवर दंडात्मक कारवाई केली आहे. कागद पत्रांअभावी वाहने जप्त, तसेच वैध कागदपत्रे नसलेली, फॅन्सी नंबर प्लेट असलेली व गंभीर नियमभंग करणारी अनेक वाहने पडताळणी अंती चाकण वाहतूक विभागाच्या आवारात जप्त करून ठेवण्यात आली आहेत. सदर कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, अप्पर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, पोलीस उपआयुक्त विक्रांत देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त जी.आर.इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत चाकण वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक दिपक गोसावी, पोलीस उपनिरीक्षक नामदेव गाडे व चाकण वाहतूक विभागाच्या सर्व पोलीस अंमलदारांनी रस्त्यावर उतरून अथक मेहनत घेतली.

> "चाकण भागातील महामार्गावर जी वाहने रस्त्याच्या कडेला 'नो पार्किंग'मध्ये लावण्यात येतात. त्यांच्यावरही कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत आणि सहकार्य करावे. वाहतुकीस अडथळा होणार नाही याची जबाबदारी आम्ही घेऊ."
>
> - दीपक गोसावी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चाकण वाहतूक विभाग,

## अग्निशमन विभागातील अनुभवी कर्मचाऱ्यांच्या सेवांचा वापर करावा

**■ आळंदी (दै. संध्या)**



आळंदी नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागात दीर्घकाळापासून कंत्राटी पद्धतीने सेवा बजावणाऱ्या पात्र, प्रशिक्षित व अनुभवी कर्मचाऱ्यांच्या सेवांचा योग्य प्रकारे उपयोग करून घेण्यात यावा, अशी मागणी नगरसेवक हेमंत उर्फ सागर गुलाबराव कुऱ्हाडे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

आळंदी हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविकांची व नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे अग्निशमन विभागाची सेवा २४ तास सक्षम आणि प्रभावी राहणे आवश्यक आहे. विभागात दीर्घकाळापासून कार्यरत असलेल्या अनुभवी कर्मचाऱ्यांकडे आवश्यक प्रशिक्षण व प्रत्यक्ष कामाचा अनुभव असल्याने त्यांच्या सेवांचा उपयोग करणे गरजेचे असल्याचे कुऱ्हाडे यांनी निवेदनात नमूद केले आहे. शासन नियम, मंजूर आकृतिबंध आणि सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीच्या अधीन राहून या कर्मचाऱ्यांच्या सेवांचा योग्य पद्धतीने उपयोग करता येईल का, याबाबत तपासणी करावी. तसेच मानधन तत्त्वावर सेवा घेणे किंवा शासन नियमांनुसार उपलब्ध असलेला अन्य योग्य मार्ग असल्यास त्याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. सदर विषय नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवून आवश्यक निर्णय घ्यावा आणि गरज भासल्यास शासन अथवा सक्षम प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करावा, अशीही मागणी सागर कुऱ्हाडे यांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निशमन विभागाचे कामकाज सुरळीत व प्रभावी राहण्यासाठी या मागणीचा सकारात्मक विचार करून नियमानुसार कार्यवाही करावी, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

## यवत येथे जखमी अवस्थेतील हरणाला वनविभागाकडून जीवदान

**■ यवत (दै. संध्या)**

यवत परिसरात जखमी अवस्थेत आढळून आलेल्या हरणाला वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने ताब्यात घेऊन उपचारासाठी प्राथमिक उपचार केंद्रात दाखल केले.

यवत येथील श्री. सचिन विलास दोरगे व श्री. रमेश सुरेशभाऊ शेळके यांना परिसरात एक हरीण जखमी अवस्थेत आढळून आले. त्यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ वनविभागाशी संपर्क साधला.

माहिती मिळताच श्री ज्ञानदेव वाल्मीक भोंडवे (वनरक्षक यवत), श्री गणेश चंद्रकांत म्हस्के (वनरक्षक राहू), श्री अक्षय शत्रुघ्न शितोळे ( वनरक्षक वाळकी ) तसेच श्रीमती भाग्यश्री टोणपे (वनपाल यवत) यांनी घटनास्थळी धाव घेतली. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी जखमी हरणाला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. श्री राहुल काळे वनपरिक्षेत्र अधिकारी दौंड यांच्या मार्गदर्शनाखाली जखमी हरणाला पुढील उपचारासाठी बावधन येथील प्राथमिक उपचार केंद्रात पाठविण्यात आले. वनविभागाच्या तत्परतेमुळे जखमी हरणाला वेळीच उपचार मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. दरम्यान, वन्यजीव जखमी अवस्थेत आढळल्यास नागरिकांनी त्यांना त्रास न देता अथवा स्वतःहून उपचार करण्याचा प्रयत्न न करता तातडीने वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.



## चाकण शहरातील टोईंग व्हॅन कारवाई बंदच राहणार

**■ चाकण (दै. संध्या)**



शहरातील नो-पार्किंगमध्ये टोईंग व्हॅनद्वारे करण्यात येणारी कारवाई पुन्हा सुरू करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा चाकण नगरपरिषदेचे शिवसेना गटनेते नितीन गोरे यांनी पोलीस आयुक्त यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी चाकण शहरातील वस्तुस्थिती, नागरिक व व्यापाऱ्यांना टोईंग व्हॅन कारवाईमुळे होणारा त्रास तसेच शहरात अद्याप स्वतंत्र व पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध नसल्याने निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

दरम्यान, नितीन गोरे यांनी यापूर्वी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची समक्ष भेट घेऊन चाकण शहरातील टोईंग व्हॅन कारवाईमुळे नागरिक व व्यापाऱ्यांना होणारा त्रास तसेच शहरात पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांना आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचनेनुसार चाकण शहरातील टोईंग व्हॅनची कारवाई यापूर्वी बंद करण्यात आली होती.

सदर कारवाई बंद केल्यानंतर आजपर्यंत चाकण शहरातील अंतर्गत मुख्य रस्त्यांवर वाहतुकीची कोणतीही मोठी अडचण निर्माण झालेली नाही, ही बाब नितीन गोरे यांनी पोलीस आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली. चाकण शहर हे मोठी बाजारपेठ असलेले शहर असून, शहराचा विकास आराखडा अद्याप मंजूर झालेला नाही. त्यामुळे शहरात स्वतंत्र व पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध नसताना नागरिकांवर टोईंग व्हॅनद्वारे कारवाई करणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच चाकण शहरातील खरी वाहतूक कोंडी ही प्रामुख्याने पुणे-नाशिक महामार्गावर होत असून, अवैध प्रवासी वाहने, चौकांमध्ये बेशिस्तपणे वाहने उभी करणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांमुळे वाहतुकीचा खोळंबा निर्माण होतो. त्यामुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील नागरिकांच्या वाहनांवर टोईंगची कारवाई करण्याऐवजी महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी नितीन गोरे यांनी केली.

पोलीस आयुक्त यांनी सकारात्मक प्रतिसाद देत चाकण शहरातील टोईंग व्हॅनची कारवाई बंदच ठेवण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. त्यानंतर पोलीस आयुक्तांच्या सूचनेनुसार चाकण शहर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपक गोसावी व चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.अंकुश जाधव यांच्यासोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीतही चाकण शहरातील वाहतूक व्यवस्था, पार्किंगची समस्या आणि नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांनी देखील चाकण शहरातील टोईंग व्हॅनची कारवाई बंदच ठेवण्यात येईल, असे मान्य केले. चाकण शहराचा विकास आराखडा मंजूर होऊन स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत टोईंग व्हॅनची कारवाई बंद ठेवण्याच्या या निर्णयामुळे शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# भोसे येथे शिक्षक पालक संघाची सर्वसाधारण सभा संपन्न

**■ चाकण (दै. संध्या)**

भोसे (ता.खेड) येथील मॉर्डन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेची शिक्षक पालक संघाची पहिली सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. या सभेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य निवृत्ती गोपाळे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य ॲड. विजय शिंदे, पोलीस उपनिरीक्षक राम मोरखंडे आदी उपस्थित होते. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली. व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी योगेश तुळशीराम कुटे यांची निवड करण्यात आली. यावेळी शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष अंकुश गांडेकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. माजी उपसरपंच मिनाक्षी लोणारी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना तुकाराम मुंढे यांच्या जीवन कार्यावर आधारित 'तुकाराम' हे पुस्तक भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि जिद्द अंगीकारण्याचा संदेश दिला. "विद्यार्थ्यांनी आयुष्यात तुकाराम मुंढे यांच्यासारखे कर्तव्यनिष्ठ व धडाडीचे अधिकारी बनण्याचे ध्येय ठेवावे "असे आवाहन यावेळी उपस्थितांनी केले. शिक्षक व पालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याबाबत चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती सोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, संस्थेचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. सुरेश तोडकर, उद्धव खरे आदींनी या उपक्रमाचे कौतुक केले.



## थोडक्यात पण महत्वाचे



## २३ कोटी निधीवरुन सांगली महापालिकेची महासभा गुंडाळली

सांगली : दैनिक संध्या

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतून महापालिकेला मंजूर झालेल्या २३ कोटी १७ लाख रुपयांच्या निधीवरून गुरुवारी महासभेत जोरदार गदारोळ झाला. सत्ताधाऱ्यांनी चर्चेविनाच हा विषय मंजूर केल्याने विरोधी काँग्रेस सदस्य महापौरांच्या आसनाकडे धावले. निधीतून नेमकी कोणती कामे केली जाणार, याची माहिती सभागृहाला देण्याची मागणी केली. पण, विषय मंजूर झाल्याने पुन्हा चर्चा नाही, अशी भूमिका महापौर धीरज सूर्यवंशी यांनी घेतली. त्यामुळे सत्ताधारी व विरोधकांत खडाजंगी झाली. याच गदारोळात अजेंड्यावरील सर्व विषय मंजूर करीत सभा गुंडाळण्यात आली. काँग्रेसने सभागृहात घोषणाबाजी करीत महापौरांनी पळ काढल्याचा आरोप केला. त्यामुळे वातावरण चांगलेच तापले होते. महापालिकेची महासभा महापौर धीरज सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपाययोजना २०२६-२७ अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत महापालिका क्षेत्रातील विविध कामांसाठी २३ कोटी १७ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून करण्यात येणारी कामे निश्चित करून त्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याचा विषय सभेपुढे होता. विरोधी पक्षनेते मंगेश चव्हाण आणि नगरसेवक संजय मेंढे यांनी विषयाला विरोध नसल्याचे स्पष्ट करत निधीतून कोणती कामे केली जाणार, कोणत्या कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येणार, याची माहिती आधी सभागृहाला द्यावी, अशी मागणी केली. मेंढे यांनी कामांची यादी सभागृहात वाचण्याची मागणी केली. मात्र, महापौरांनी विषय मंजूर झाल्याचे जाहीर करून नगरसचिवांना पुढील विषय वाचण्याचे आदेश दिले. काँग्रेस नगरसेवकांचा विरोध सुरू असतानाच विषयपत्रिकेचे वाचन सुरू राहिल्याने सभागृहात गोंधळ उडाला. सभा गुंडाळली जाणार असल्याचे लक्षात येताच मंगेश चव्हाण, संजय मेंढे यांच्यासह काँग्रेस नगरसेवकांनी महापौरांसमोरील आसनाकडे धाव घेत कामांची यादी वाचण्याची मागणी केली. त्याला सत्ताधारी नगरसेवकांनीही विरोध केला. सभागृह नेते संदीप आवटी यांनी सर्व विषय मंजूर झाल्याचे सांगत सत्ताधारी नगरसेवकांनी 'मंजूर, मंजूर'च्या घोषणा दिल्या यानंतर महापौरांनी विषयपत्रिकेवरील तसेच ऐनवेळीचे सर्व विषय मंजूर झाल्याचे जाहीर करून सभागृहातून बाहेर पडत सभा गुंडाळली. त्यानंतर काँग्रेस नगरसेवकांनी महापौर पळाले, १५ कोटी कशासाठी, टक्केवारीसाठी', '२३ कोटी कशासाठी, टक्केवारीसाठी' अशा घोषणा देत सभागृह दणाणून सोडले. काँग्रेसची घोषणाबाजी सुरू असतानाच सत्ताधारी भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या नगरसेवकांनीही सभागृह सोडले. आयुक्त संतप्त; सभात्यागाचा इशारा पंधराव्या वित्त आयोगातील १५ कोटी रुपयांचा निधी ठेकेदारांची बिले काढण्यासाठी वापरला जाणार असून प्रशासनाने 'सुपारी' घेतल्याचा आरोप विरोधी पक्षनेते मंगेश चव्हाण यांनी केला. या आरोपांवर आयुक्त संजीता महापात्र संतप्त झाल्या. प्रशासनावर वारंवार टक्केवारी आणि 'सुपारी' घेतल्याचे आरोप केले जात असल्याचा निषेध करत सभात्याग करण्यासाठी त्या खुर्चीवरून उठल्या. महापौर आणि सत्ताधारी नगरसेवकांनी त्यांची समजूत काढली. त्यानंतर आयुक्त पुन्हा सभेत बसल्या.

## बँक खात्यांवर बरसला पैशांचा पाऊस... सांगली जिल्ह्यातील पाचजणांवर गुन्हा

सांगली : दैनिक संध्या

आकर्षक कमिशनच्या हव्यासापोटी जिल्ह्यातील अनेक खातेदारांनी ऑनलाइन फसवणुकीतील कोट्यवधी रुपये खात्यावर घेऊन ते हस्तांतरित केल्याचे पोलिसांनी 'मनी ट्रेल' वरून निष्पन्न केले आहे. ६ कोटी रुपयांहून अधिक रक्कम खात्यावर आल्यानंतर ती हस्तांतरित केल्याप्रकरणी पलूस, भिलवडी, कोकरूड, तासगावमधील पाच जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे संबंधित खातेदारांचे धाबे दणाणले आहे. याप्रकरणी अमित सुनील तुपे (रा. भिलवडी), रामचंद्र कुमार सूर्यवंशी (रा. आमणापूर, ता. पलूस), गणेश मोहन तिरमारे (वय ४७, रा. दुधोंडी, ता. पलूस), विजय उत्तम पाटील (रा. पणुंब्रे तर्फ वारूण, ता. शिराळा), सुमित श्रीकांत कांबळे (रा. मतकुणकी, ता. तासगाव) यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. या पाच जणांनी तब्बल सहा कोटींहून अधिक रक्कम खात्यावर स्वीकारून पुढे हस्तांतरित केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. काही संशयितांच्या रकमेचा आकडा समजला नसून हे गुन्हे पोलिस तपासावर आहेत. हा सर्व प्रकार २०२५ मधील कालावधीत घडला आहे. दुधोंडीच्या गणेश तिरमारे याच्या खात्यावर तब्बल ३ कोटी ३२ लाख १९ हजार ६४० रुपये आले होते. भिलवडीच्या अमित तुपे याच्या खात्यावरही तब्बल २ कोटी ८८ लाख २३ हजार ४१९ रुपये आले होते. तर मतकुणकीच्या सुमित कांबळेच्या खात्यावर १९ लाख १७ हजार ५९६ रुपये जमा झाले होते. इतर दोघांच्या खात्यावरील रकमेबाबत तपास सुरू आहे.

## आमच्याकडे बहुमत, अशीच महासभा चालवणार : महापौर धीरज सूर्यवंशी

सांगली : दैनिक संध्या

सांगली : सांगलीकरांच्या हिताचे सर्व विषय महासभेत मंजूर करण्यात आले आहेत. मात्र, विरोधक केवळ प्रसिद्धीसाठी गदारोळ करतात. झोपेतून उठल्यापासून विरोधी पक्षनेत्यांच्या डोक्यात केवळ टक्केवारी, सुपारीचा विषय असतो. त्यामुळेच ते बिनबुडाचे आरोप करीत आहेत. यापुढे विरोधकांची दादागिरी खपवून घेणार नाही. सभागृहात आमच्याकडे पूर्ण बहुमत आहे. त्यामुळे यापुढेही अशाच पद्धतीने महासभेचे कामकाज चालविले जाईल, असा स्पष्ट इशारा महापौर धीरज सूर्यवंशी यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिला. महापौर सूर्यवंशी म्हणाले, काँग्रेसच्या विरोधी नगरसेवकांना झोपेतून उठल्यापासून 'टक्केवारी'चा विषय आठवतो. महासभेतील प्रत्येक विषयावर सत्ताधाऱ्यांवर टक्केवारीचे आरोप केले जातात. या आरोपांशी आमचा काहीही संबंध नाही. यापूर्वी विरोधकांचे आरोप खपवून घेतले; मात्र यापुढे ते सहन केले जाणार नाहीत. विरोधकांना विकासाच्या विषयांवर चर्चा करायची नसते. प्रत्येक महासभेत विरोध, गदारोळ आणि दमबाजी केली जाते. विरोधी पक्षनेते मंगेश चव्हाण यांना माध्यमांमधून प्रसिद्धी हवी असल्यानेच सत्ताधाऱ्यांवर आरोप केले जातात. केवळ प्रसिद्धीसाठी स्टंट सुरू आहे, असा आरोपही सूर्यवंशी यांनी केला. आमच्याकडे संख्याबळ आहे आणि त्याआधारे सभागृहाचे कामकाज यापुढेही चालविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अजेंड्यावरील सर्व विषय मंजूर आहेत. 'एक ज'मधील जे काही विषय असतील ते सांगलीकरांच्या हिताचेच असतील, असे सांगून ते मंजूर केले आहेत. विरोधकांचा विरोध मोडून काढून सभागृह चालविले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपमहापौर गजानन मगदूम, स्थायी समिती सभापती अतुल माने, राष्ट्रवादीचे गटनेते मैनुद्दीन बागवान, माजी महापौर दिग्विजय सूर्यवंशी, गटनेते संदीप आवटी आणि संतोष पाटील उपस्थित होते.

# शक्तिपीठ महामार्ग शेतकऱ्यांसाठी नव्हे, तर उद्योगपतींसाठी

■ सांगली (दै. संध्या)

शक्तिपीठ महामार्ग शेतकऱ्यांसाठी नसून उद्योगपतींसाठी आहे. तो आम्ही हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा आमदार जयंत पाटील यांनी दिला. सांगलीत शुक्रवारी शक्तिपीठविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोर्चानंतर झालेल्या सभेत पाटील बोलत होते.

मोर्चात खासदार विशाल पाटील, आमदार सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा संगीता पाटील, माजी आमदार शिवाजीराव नाईक, धनाजी गुरव, रासपचे नेते महादेव जानकर, गिरीश फोंडे, रविराज साबळे, मनसेचे तानाजी सावंत, देवराज पाटील, रणधीर नाईक, राजेश नाईक, जयसिंग शेंडगे, जिल्हा परिषद सदस्य अभिजित पाटील, भारत डुबुले, संदीप राजोबा, बी.जी. पाटील, दिगंबर कांबळे आदी सहभागी झाले.

विश्रामबाग चौकात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून मोर्चाची सुरुवात झाली. अग्रभागी लोकप्रतिनिधी, त्यानंतर महिला व त्यांच्या मागे हजारो शेतकरी मोर्चात सहभागी होते. अग्रभागी कडाडत्या आवाजात आसूड ओढणाऱ्या शेतकऱ्याने लक्ष वेधून घेतले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलक नेत्यांनी भूमिका मांडल्या. त्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांना मागण्यांचे निवेदन दिले.

सभेत जयंत पाटील म्हणाले, लोक नको म्हणत असतानाही शासन महामार्गाची कामे करत आहे. गावात पाणंद रस्ता मागतोय, पण तो मिळत नाही. मात्र अर्ज न करताच महामार्ग केला जात आहे. पत्रादेवीला जाण्यासाठी अनेक मार्ग आहेत, त्यामुळे शक्तिपीठची गरज नाही. निधीअभावी शासनासमोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. इतिहासात प्रथमच मुंबईत आझाद मैदानावर कंत्राटदारांनी उपोषण सुरु केले आहे. निधीअभावी विकासकामे थांबली आहेत. नवा आमदार निधी अद्याप आलेला नाही. तरीही शक्तिपीठसाठी १ लाख २५ हजार कोटी रुपये कोठून येत आहेत? जमिनीची मोजणी करायला आल्यावर काय करायचे, हे शेतकऱ्यांना माहिती आहे. मोजणी करणाऱ्यांना गावात येऊ द्यायचे की नाही, हे गावाने बसून ठरवावे. जमिनीचे पैसे वर्षभरात संपतील. समृद्धी महामार्गातून मिळालेले पैसेही वर्षभरात संपले, तेथील शेतकऱ्यांना आता पुढे काय करायचे, हा प्रश्न पडला आहे.

पाटील म्हणाले, शेतकऱ्यांनी आपल्यापुरता विचार न करता नातवाचा विचार करायला हवा. पैसे येतात जातात, पण जमीन हाती राहत नाही. रस्ते आठ पदरी करण्यास आमची हरकत नाही, पण सध्या रस्ते उपलब्ध असताना या नव्या रस्त्याची गरज काय? हा शक्तिपीठ नसून सत्ताधाऱ्यांचे पीठ आहे. त्यात त्यांना स्वतःची व्यवस्था करायची आहे.सतेज पाटील म्हणाले, महामार्गाविरोधात दीर्घ काळ लढा सुरु आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तो रद्द करण्याचे आश्वासन निवडणुकीत दिले होते, पण फसवणूक झाली. निवडणुकीनंतर नव्या रेखांकनाने काम सुरु झाले आहे. त्याला सर्व १२ जिल्ह्यांत विरोध आहे. सरकारकडे विकासकामांना पैसे नाहीत, मात्र शक्तिपीठसाठी हजारो कोटी रुपये आहेत. पैसे खर्चायचेच असतील तर प्रत्येक गडकिल्ल्याला ५०० कोटी द्या. ग्रामपंचायतींना पैसे द्या, त्यातून रस्ते दुरुस्त करू. सरकारने जमिनींसाठी गावोगावी एजंट सोडले आहेत. १० टक्के कमिशनवर जमिनी घेत आहेत. हे चालवून घेऊ नका. यावेळी महादेव जानकर, रवीराज साबळे यांनीही भूमिका मांडली.विशाल पाटील म्हणाले, जमीन मोजणीसाठी पहाटे चोरीछुपे अधिकारी येत आहेत. पण आम्ही शेवटपर्यंत त्यांच्याविरोधात लढा देत राहू. शेतकऱ्यांच्या मुलांमुळे देश टिकून आहे, पण शासनाकडून शेतकऱ्यांना उध्वस्त करण्याचे काम सुरु आहे. हा रस्ता देवांसाठी नसून उद्योगपतीसाठी आहे. जमिनी दिल्यास आम्हाला त्यांच्याकडेच मजुरीला जावे लागेल. महामार्गापासून सर्व शक्तिपीठे दूर आहेत, त्यामुळे याला शक्तिपीठ तरी कसे म्हणायचे?राजू शेट्टी म्हणाले, कोणत्याही परिस्थितीत संयुक्त मोजणी होऊ देणार नाही. सरकार बेकायदेशीर काम करत आहे. रीतसर सुनावणी घ्यायला हवी. रात्रीबेरात्री चोरासारखे येऊन मोजण्या करत आहेत. आम्ही दरोडेखोरांना देतो, ती ट्रीटमेंट प्रसंगी पोलिसांनाही देऊ. पोलिसांनी शेतकऱ्यांच्या केबल, मोटर चोरीचा शोध घ्यावा. मोजणीला संरक्षण देऊ नका. २०२९ च्या निवडणुकीतील खर्चासाठी पैसे काढण्याचा हा मार्ग आहे. महामार्गामुळे महापुराचा फटका बसेल, उस शेती संपेल. राजू शेट्टी म्हणाले, महामार्गाच्या विषयावर एकदा जिल्ह्याची फाळणी होऊन जाऊ दे. विरोधातले आणि बाजूचे जाहीर होऊ दे. दरोडे घालणाऱ्यांचा बंदोबस्त प्रसंगी कायदा हाती घेऊन करू. केसेसला घाबरून जाऊ नका. कोणी आत गेला तर, बाहेर आल्यावर त्याची मिरवणूक काढा. स्वातंत्र्यसैनिक म्हणून सत्कार करा.




## खुशाल गोळ्या घाला, रामराजेंच्या आव्हानानंतर रणजितसिंह पोहोचले गजानन चौकात

■ फलटण (दै. संध्या)

विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर आणि माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यातील राजकीय संघर्ष पुन्हा एकदा टोकाला पोहोचला आहे. साखरवाडी येथे श्रीराम सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांना शेअर्स रक्कम भरण्याचे आवाहन करण्यासाठी आयोजित सभेत रामराजे यांनी रणजितसिंह यांना 'विना सुरक्षा, विना कार्यकर्ते समोर या. मग तुमच्याकडे बघू,' असे खुले आव्हान दिले होते. या आव्हानाचा स्वीकार करत रणजितसिंह बुधवारी (दि. १९) रात्री थेट फलटणच्या मध्यवर्ती गजानन चौकात एकटेच दाखल झाले. तासभर चौकात थांबल्यानंतर ते रामराजेंच्या घराबाहेरही पाच मिनिट थांबले. या घटनेने फलटणमधील राजकीय वातावरण तापले आहे. रणजितसिंह यांनी पत्रकार परिषदेतच



आपण गजानन चौकात येणार असल्याचे जाहीर केले होते. 'विना सुरक्षा आणि विना कार्यकर्ते येत आहे. मला गोळ्या घालायच्या असतील तर खुशाल घाला,' असे ते म्हणाले होते. त्यानंतर रात्री साडेनऊच्या सुमारास ते गजानन चौकातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर एकटेच पोहोचले. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना रणजितसिंह म्हणाले, 'मला फलटणचा विकास करायचा आहे. मात्र, सतत एकटं भेटा, अशी आव्हाने रामराजे देत आहेत. त्यांचे आव्हान स्वीकारून मी दुसऱ्यांदा गजानन चौकात आलो आहे. मात्र, ते लपून बसले आहेत.'

गजानन चौकात तासभर थांबून ते एकटेच रामराजे यांच्या निवासस्थानाकडे गेले. गेटवर थांबून त्यांनी रामराजेंची पाच मिनिट वाट पाहिली. यावेळी सोबत आलेल्या काही कार्यकर्त्यांना त्यांनी आपआपल्या घरी जाण्यास सांगितले. आव्हान-प्रतिआव्हानांमुळे फलटण शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावर आता रामराजेंकडून काय प्रत्युत्तर येते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. साखरवाडी येथील सभेत फलटणच्या तरुण महिला सभापतींवर रामराजे यांनी पातळी सोडून टीका केल्याचा आरोपही रणजितसिंह यांनी केला. महिलांविषयी अशा प्रकारची वक्तव्ये करणे निषेधार्ह असून, रामराजे यांच्या या कृत्याचा आपण जाहीर निषेध करतो, असे ते म्हणाले.

## वेदांतिकाराजे भोसले यांची एन्ट्री

### उदयनराजे गटाच्या भूमिकेकडे लक्ष

■ सातारा (दै. संध्या)

सातारा जिल्हा बँकेच्या सोसायटी मतदार संघात आतापर्यंत अजिंक्य राहिलेले मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले रिझर्व्ह बँकेच्या नियमामुळे या निवडणुकीच्या रिंगणाबाहेर राहणार आहेत. त्यामुळे हे अजिंक्यपद कोणाकडे राहणार याची उत्सुकता असतानाच आष्टे विकास सोसायटीतून वेदांतिकाराजे भोसले यांच्या नावाचा ठराव झालेला असल्यामुळे त्यांची जिल्हा बँकेत एन्ट्री होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

सातारा जिल्हा बँकेच्या राजकारणात मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा दबदबा राहिला आहे. सातारा सोसायटी मतदार संघातून निवडून जाणारे शिवेंद्रसिंहराजे भोसले गेल्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आले होते. मात्र, सलग दहा वर्षे संचालक राहिलेल्या व्यक्तींना आरबीआयच्या नियमांनुसार यावेळी निवडणूक लढविता येणार नसल्याने शिवेंद्रसिंहराजे यांच्या जागी कोणाला संधी मिळणार, याची उत्सुकता वाढली आहे.

दरम्यान, सातारा विकास सोसायटी मतदार संघातून १४६ ठराव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी आष्टे विकास सोसायटीतून शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पत्नी वेदांतिकाराजे भोसले, रामकृष्णनगर सोसायटीतून शिवेंद्रसिंहराजे भोसले, लिंब सोसायटीतून त्यांचे विश्वासू कार्यकर्ते जितेंद्र सावंत यांच्या नावाचा ठरावा झाला आहे. मांडवे सोसायटीतून विक्रम लालासो पवार यांच्या नावाचा ठराव झाला आहे. त्यामुळे शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या जागी त्यांचे विश्वासू सहकाऱ्यांना संधी मिळणार की जिल्हा बँकेचे राजकारण हाताळण्याच्या दृष्टीने वेदांतिकाराजे भोसले यांना संधी मिळणार याची उत्सुकता लागली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत भाजपने स्वतंत्र पॅनेल उभे करण्याचा निर्णय घेतल्यास समीकरणे बदलू शकतात. अशा परिस्थितीत खंबीर संचालक जिल्हा बँकेत जाण्याच्या दृष्टीने भाजप तसेच शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निर्णयाकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.

## मास्क गँगचा मुंढेत धुमाकूळ; फ्लॅट फोडून ऐवज लंपास

■ कराड (दै. संध्या)

मास्क व ग्लोव्हज घातलेल्या चोरट्यांनी अपार्टमेंटमधील पाच ते सहा फ्लॅट फोडून किमती ऐवज लंपास केला. मुंढे येथील साई विश्व आणि साईराम गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये ही खळबळजनक घटना घडली. तोंडाला मास्क व हातात ग्लोव्हज घातलेले तीन ते चार संशयित चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. चोरट्यांनी बंद घरांना लक्ष्य केल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे.

मुंढे येथील साई विश्व आणि साईराम गॅलेक्सी अपार्टमेंटमधील बंद आठ फ्लॅटची कुलपे कटावणीने तोडत चोरी केली. चोरीचा हा सर्व घटनाक्रम अपार्टमेंटमधील सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. या सीसीटीव्ही फुटेजमध्ये हे चोरटे अतिशय सावधपणे वावरताना दिसत आहेत. घरफोडी करण्यापूर्वी त्यांनी परिसराची पाहणी केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. समोर आलेले सीसीटीव्ही फुटेज हा सध्या या घटनेतील सर्वात महत्त्वाचा धागा आहे. मास्क आणि ग्लोव्हजमुळे चोरट्यांची ओळख पटवणे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. मुंढे गावातील या घरफोडीच्या घटनेने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.




## मशीन खरेदीच्या व्यवहारातून साताऱ्यातील महिलेची सहा कोटींची फसवणूक

■ सातारा(दै. संध्या)

पुठ्ठा तयार करण्याच्या मशीन व्यवहारामध्ये साताऱ्यातील एका महिलेची तब्बल ६ कोटी ३५ लाख ७ हजार ६०० रुपयांची फसवणूक झाली. याप्रकरणी सातारा तालुका पोलिस ठाण्यात पंजाबमधील तिघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून, ही फसवणुकीची घटना सातारा येथे जुलै २०२३ मध्ये घडली.

मुक्तारसिंग थिंड, अमरदीपसिंग उर्फ दिपू मुक्तारसिंग थिंड, अविनाश उर्फ आशु मुक्तारसिंग थिंड (सर्व रा. दाबुर्जी, अमृतसर, पंजाब) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. याबाबत साताऱ्यातील एका महिलेने फिर्याद दिली आहे. संबंधित महिलेची सातारा परिसरात पुठ्ठा तयार करण्याची कंपनी आहे. या कंपनीमध्ये कच्चा माल तयार करण्यासाठी पंजाबमधील सिनियर मशीनरी




मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने त्यांना मशीनरी देण्याचे आश्वासन दिले. या मशीनरी पाहण्यासाठी त्या कंपनीमध्ये समक्ष गेल्या.

त्यावेळी संशयितांनी मशीनरी दाखवल्या. या मशीनरी पसंत पडल्यानंतर २६ मशीनरींचा खरेदी व्यवहार ठरला. या मशीनरींचे एकूण ६ कोटी ३५ लाख ७ हजार ६०० रुपये संशयितांना आरटीजीएसने पाठविले. त्यानंतर संशयितांनी महिलेला कंपनीमध्ये दाखविलेल्या मशीनरी न पाठविता खराब मशीनरी पाठविल्या. मशीनरी खराब आहेत, असे कंपनीला फोनवरून कळविण्यात आले. परंतु त्यानंतर ते फोन उचलण्यास टाळाटाळ करू लागले.

काही दिवसानंतर त्यांनी फोन उचलल्यानंतर मशीनरी दुरुस्त करून देतो, नवीन पाठवतो, असे सांगितले.

# मिनींचा भोगवटादार वर्ग करण्याच्या प्रक्रियेत बनावट मूल्यांकन दाखला

■ फलटण (दै. संध्या)

कोळकी, ता. फलटण येथील जमिनींचा भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ करण्याच्या प्रक्रियेत बनावट मूल्यांकन दाखला सादर करून शासनाची फसवणूक केल्याच्या आरोपावरून फलटणमधील आठ बिल्डरांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. यातील तिघांना पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. निखिल रामदास देवकर, प्रवीण ज्ञानेश्वर नाईक निंबाळकर, रामचंद्र ज्ञानेश्वर नाईक निंबाळकर, अभिजित तुकाराम इंगळे, वीरेंद्र विक्रम झांजुर्णे, रणधीर धनसिंगराव भोईटे, विक्रम महादेवराव झांजुर्णे, राजेंद्र सदाशिव कापसे (सर्व रा. फलटण) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित बिल्डरांची नावे आहेत. यातील रणधीर भोईटे, विक्रम झांजुर्णे, राजेंद्र कापसे यांना पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने या तिघांना चार दिवस पोलिस



कोठडी सुनावली आहे. याबाबत निवासी नायब तहसीलदार अभिजित सोनवणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, रणधीर भोईटे यांनी कोळकी येथील जमिनी भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ करण्यासाठी तहसील कार्यालयात अर्ज केला होता. या अर्जासोबत सहायक दुय्यम निबंधक वर्ग-२, फलटण यांचा कार्यालयीन शिक्का असलेला मूल्यांकन दाखला सादर करण्यात आला होता. यानंतर तहसील कार्यालयाने रणधीर भोईटे व इतरांना नोटीस बजावून त्यांचा लेखी खुलासा घेतला होता. दरम्यान, या प्रकरणात शासनाच्या महसुलाचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचे नमूद करत जिल्हाधिकाऱ्यांनी तक्रारदाराने केलेला तक्रार अर्ज निकाली काढला होता. मात्र, दुसऱ्या तक्रारदाराने स्वतंत्र अर्ज करून बनावट मूल्यांकन दाखला सादर करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करत रणधीर भोईटे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. तहसीलदारांच्या प्राधिकृत आदेशानंतर निवासी नायब तहसीलदार अभिजित सोनवणे यांनी फलटण शहर पोलिस ठाण्यात संबंधित आठ बिल्डरांविरोधात तक्रार दाखल केली. या संशयितांनी मूल्यांकन दाखला नेमका कसा व कोणी तयार केला आणि त्याचा वापर कोणत्या उद्देशाने करण्यात आला, याचा आता पोलिस तपास करत आहेत. सहायक पोलिस निरीक्षक सचिन शिंदे हे अधिक तपास करत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शेतीच्या उत्पादकता वाढीसाठी डिजिटल ट्विन लर्निंग प्रकल्प

**मुंबई : दैनिक संध्या**

कृषि विभागाने राज्यातील शेतीचे उत्पादन वाढण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह तंत्रज्ञान, ड्रोन, आयओटी सेन्सर्स आणि डेटा ॲनालिटिक्सवर आधारित अभ्यास करावा. कापूस, सोयाबीन, तूर,ऊस,संत्रे,हळद,कांदा व मका या पिकांसाठी 'शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्प महाराष्ट्रात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यासाठी पहिल्या टप्प्यात दहा हजार शेतकऱ्यांची निवड करावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे' शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्प सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी बैठकीत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ऑनलाईन व्ही.सी.व्दारे कृषी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, सहकार राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल,अपर मुख्य सचिव वित्त विकास चंद्र रस्तोगी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, नानाजी कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक मीनल करनवाल, सकाळ समुहाचे अध्यक्ष प्रताप पवार, ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक अजित जावकर, मायक्रोसॉफ्टच्या सपना मोहरिया, कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्रोटेक नाविन्यता केंद्राचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी पराग दाभाडे, ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलवडे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हवामान बदल,पाणीटंचाई,जमिनीची घटती सुपीकता, कीड व रोगांचा वाढता प्रादुर्भाव,वाढता उत्पादन खर्च या आव्हानांवर मात करण्यासाठी बारामती येथील ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने 'शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्प विकसित केला आहे. या प्रकल्पाचा विभागनिहाय पिकवार अभ्यास करावा.पिकांची वाढ, पाण्याची गरज, जमिनीतील ओलावा, हवामान, कीड-रोगांचा प्रादुर्भाव आणि संभाव्य उत्पादन याबाबत विविध स्रोतांमधून माहिती संकलित करून एकत्रित सक्षम डिजिटल प्रणाली तयार करावी. मिळणाऱ्या माहितीचे मशीन लर्निंगच्या माध्यमातून विश्लेषण करून शेतकऱ्यांना पीकनिहाय आणि शेतनिहाय सल्ला देण्याची गरज असून जेणेकरून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ट्रस्टने 'शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात निवडक पिके व निवडक शेतकऱ्यांचा अभ्यास करून हा प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर पुढील टप्प्यात राज्यात मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्यासाठी कार्यवाही करावी. ‘एआय’ आधारित सिंचन व्यवस्थापनामुळे पाण्याचा वापर कमी करावा. पिकासाठी या मॉडेलव्दारे पिकाचा उत्पादन खर्च कमी करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मॉडेल विकसित करावे. शेतकऱ्यांचे शेतीतील उत्पन्न वाढून शेतकरी आर्थिकदृष्टया सक्षम होईल.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानासाठी वाढीव जागेचा प्रस्ताव सादर करा

**मुंबई : दैनिक संध्या**

कल्याण पश्चिम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या विकासासाठी उद्यानालगतची २ एकर जमीन उपलब्ध करून देण्यासाठी आरक्षण बदलाचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करावा, असे निर्देश अण्णा बनसोडे यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाला दिले. जागा उपलब्ध करून देण्याबाबत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे बैठक झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या सुशोभीकरण व विकासासाठी वाढीव जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी उद्यानालगतची सुमारे २ एकर जमीन उद्यानाच्या विकासासाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आरक्षण बदलाचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या विकासाला गती मिळावी आणि स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत उद्यानाचे नियोजित सुशोभीकरण प्रभावीपणे पूर्ण व्हावे, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आवश्यक कार्यवाही करावी, असेही निर्देश बैठकीत देण्यात आले. बैठकीस नगरविकास विभागाचे अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे उपायुक्त, नगररचना अधिकारी तसेच आंबेडकरी चळवळीतील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मराठी-गुजराती साहित्यिक आदान-प्रदानातून ‘नटसम्राट’चे गुजराती नाट्यरूपांतर

**मुंबई : दैनिक संध्या**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या वतीने मराठी-गुजराती साहित्यिक व सांस्कृतिक आदान-प्रदानाला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) लिखित अजरामर मराठी नाटक ‘नटसम्राट’चे गुजराती भाषेतील नाट्यरूपांतर प्रथमच रंगभूमीवर सादर करण्यात येणार आहे. या गुजराती अनुवादित नाटकाचा पहिला प्रयोग शनिवार, 22 ऑगस्ट 2026 रोजी सायंकाळी 7 वाजता लघु नाट्यगृह, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे होणार आहे. हा पहिला प्रयोग केवळ निमंत्रितांसाठी आयोजित करण्यात आला आहे. या विशेष उद्‌घाटन समारंभास सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी तसेच पॉप्युलर प्रकाशनचे व्यवस्थापकीय संचालक रामदास भटकळ यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या नाट्यप्रयोगाचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. ‘नटसम्राट’ हे मराठी रंगभूमीवरील अत्यंत लोकप्रिय आणि प्रभावी नाटक असून, कलाकाराच्या आयुष्यातील संघर्ष, मानवी नातेसंबंध, यश-अपयश आणि भावभावनांचे प्रभावी चित्रण या नाटकातून करण्यात आले आहे. कुसुमाग्रज लिखित हे नाटक मराठी साहित्य आणि रंगभूमीचा अमूल्य ठेवा मानले जाते. १९७० मध्ये प्रकाशित झाल्यानंतर ‘नटसम्राट’ने मराठी रंगभूमीवर मैलाचा दगड निर्माण केला. गेल्या पाच दशकांहून अधिक काळात या नाटकाचे हजारो प्रयोग झाले असून, अनेक पिढ्यांतील रसिकांनी या कलाकृतीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. डॉ. श्रीराम लागू, दत्ता भट, चंद्रकांत गोखले, मोहन जोशी आणि विक्रम गोखले यांसारख्या दिग्गज कलाकारांनी गणपतराव बेलवलकर ही भूमिका साकारून नाटकाच्या लोकप्रियतेत मोलाची भर घातली. मराठी साहित्याची समृद्ध परंपरा आणि त्यातील मानवी मूल्ये गुजराती भाषिक वाचक आणि रसिकांपर्यंत पोहोचविणे, तसेच दोन्ही भाषांमधील साहित्यिक व सांस्कृतिक संवाद अधिक दृढ करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. साहित्य, भाषांतर, परिसंवाद, नाट्यप्रयोग, चर्चासत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध भाषा व संस्कृतींना जोडण्याचे कार्य महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या माध्यमातून केले जात आहे. या पहिल्या प्रयोगानंतर राज्यात आणखी ९ प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. त्यामुळे मराठी रंगभूमीवरील या अभिजात कलाकृतीचे गुजराती भाषेतील रूपांतर अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

# लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य नव्हे, तर कायद्याचे राज्य

**■ पुणे (दै. संध्या)**

संविधान म्हणजे केवळ सामान्य नागरिकांसाठी करण्यात आलेले नियम नसून सरकारला चौकटीत बांधून ठेवणारी व्यवस्था आहे. जनता आणि सरकार या दोघांचेही अधिकार व मर्यादा संविधानाने स्पष्ट केल्या आहेत. मात्र, नागरिकांना आपल्या घटनात्मक अधिकारांची पुरेशी जाणीव नसल्याने सरकारकडून मर्यादा ओलांडण्याची शक्यता निर्माण होते. लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य नव्हे, तर कायद्याचे राज्य होय. जनतेला जो न्याय लागू होतो, तोच सरकारलाही लागू झाला पाहिजे. मात्र, सरकारच्या मनमानी कारभारामुळे आज ही परिस्थिती दिसून येत नाही, अशी टीका ज्येष्ठ लेखक व पत्रकार सुरेश द्वादशीवार यांनी केली.

ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत आणि युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या ८५व्या जयंतीनिमित्त गांधी भवन येथे शुक्रवारी ‘संविधानासमोरील प्रश्न’ या विषयावर द्वादशीवार यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार होते. या प्रसंगी विश्वंभर चौधरी , असीम सरोदे, अनंत बागाईतकर, रवींद्र पोखरकर , प्रवीण सपतर्षी, प्रमोद वागदरीकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.




संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वस्त सचिव अन्वर राजन यांनी केले. द्वादशीवार म्हणाले, “डॉ. कुमार सप्तर्षी यांचे आपल्यात नसणे ही अत्यंत दुःखद बाब आहे. त्यांच्याशी माझा सुमारे ६० वर्षांचा संपर्क होता. आमच्यात वैचारिक मतभेद होते; मात्र मनभेद कधीच नव्हते. कुमार हा केवळ नेता नव्हता, तर खरा कार्यकर्ता होता. “राज्यशास्त्राचा २६ वर्षे प्राध्यापक म्हणून काम करताना संविधानातील अनेक शब्द आपण रोज वापरतो; मात्र त्यांचे खरे अर्थ कितीजणांना उमगले आहेत, हा प्रश्न आहे. समाजवाद म्हणजे गरिबांच्या बाजूने उभे राहणे. गांधीवादाचीही ठरावीक चौकट नाही. महात्मा गांधी परिस्थितीनुसार स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेत असत. त्याचप्रमाणे डॉ. सप्तर्षी कोणाचेही अनुयायी नव्हते. त्यांनी कोणत्याही विचारसरणीच्या चौकटीत अडकून न पडता स्वतंत्र संघटन उभे केले. संविधानात भारताला प्रजासत्ताक म्हटले आहे. मात्र, सत्तेवर बसलेला व्यक्ती सम्राटासारखा वागत असेल आणि त्याच्या शब्दाला संसद व न्यायालयही मान्यता देत असेल, तर प्रजासत्ताक केवळ कवितेपुरते उरते, अशी टीका द्वादशीवार यांनी केली.

धर्मनिरपेक्षतेचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणाले, “मानवी जीवनातील उच्च नैतिक मूल्यांचे रक्षण करणारी धारणा म्हणजे धर्मनिरपेक्षता. धर्माच्या नावावर इतिहासात मोठ्या प्रमाणावर संघर्ष आणि हिंसा झाली आहे. त्यामुळे धर्म, जात आणि पंथाच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार करणे आवश्यक आहे.” देशातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक न्यायाचा अर्थ नागरिकांनी समजून घेतला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कर्तृत्वानुसार संधी मिळणे म्हणजे न्याय होय. लोकप्रतिनिधी आपण निवडतो, त्यामुळे त्यांच्या कामाचा जाब विचारण्याचा अधिकार नागरिकांना आहे. धर्म, विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असेल, तर लोकशाहीसमोर गंभीर प्रश्न निर्माण होतात, असेही त्यांनी सांगितले.

देशातील मोठ्या लोकसंख्येचे जीवन आजही सरकारी अन्नधान्यावर अवलंबून आहे. मात्र, या परिस्थितीबाबत सरकारला जाब विचारण्यासाठी नागरिक संघटितपणे पुढे येत नाहीत. समाज जात-धर्माच्या आधारावर विभागला जात आहे. शिक्षणाचे बाजारीकरण झाले असून सरकारी शाळांची संख्या कमी होत असताना खासगी शिक्षणाचा विस्तार होत आहे. मतदार याद्यांच्या पुनरिक्षणाच्या प्रक्रियेत विशिष्ट समाजघटकांच्या नावांबाबत प्रश्न उपस्थित होत असतील, तर समानतेच्या घटनात्मक तत्त्वाबाबतही चिंता निर्माण होते, असे द्वादशीवार यांनी नमूद केले.

“संविधानाची उद्देशिका ही घटनेचा पाया आहे. नागरिकांना आपले घटनात्मक अधिकार समजले, तर सरकारला जाब विचारता येईल आणि सरकारला वठणीवर आणता येईल. देशाने संविधानाच्या मूळ चौकटीकडे पुन्हा गांभीर्याने पाहण्याची गरज आहे,” असे आवाहन द्वादशीवार यांनी केले. उल्हास पवार म्हणाले, “सर्वसामान्यांच्या अपेक्षांचे सरकारच्या माध्यमातून परिवर्तन होणे, हे लोकशाहीचे प्रमुख लक्षण आहे. मानवता, समता आणि नैतिकता या मूल्यांचा आदर्श महात्मा गांधी यांच्या विचारांतून शिकता येतो. गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार एकत्रितपणे समाजापर्यंत पोहोचविण्याची आज गरज आहे. जात-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवता हीच जात आणि भारतीयत्व हाच धर्म मानला पाहिजे.” राजन म्हणाले, “व्यक्ती नसली तरी संस्था आणि तिचे उपक्रम थांबता कामा नयेत, ही डॉ. सप्तर्षी यांची भूमिका होती. त्यानुसार त्यांच्या जन्मदिनानिमित्त हे व्याख्यान आयोजित करण्यात आले. संविधानाच्या मूलभूत मूल्यांशी सोयीस्करपणे खेळ केला जात असल्याची भावना निर्माण होत आहे. न्यायव्यवस्थेची भूमिकाही चिंताजनक आहे. मात्र, यापुढे सर्व संस्थांनी अधिक जबाबदारीने वागण्याची गरज आहे.”

## ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाची पुण्याला भेट

**■ पुणे (दै. संध्या)**

ऑस्ट्रेलियन विद्यापीठे, उच्चशिक्षण संस्था आणि शालेय मंडळांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २२ सदस्यीय ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाने ‘ऑस्ट्रेड हायर एज्युकेशन वीक २०२६’चा भाग म्हणून १६ आणि १७ ऑगस्ट २०२६ रोजी पुण्याला भेट दिली. ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील विद्यार्थी देवाणघेवाण वाढवणे आणि शैक्षणिक संबंध अधिक दृढ करणे, हा या भेटीचा प्रमुख उद्देश होता. ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाच्या या भेटीचे नेतृत्व ऑस्ट्रेलिया सरकारच्या ‘ऑस्ट्रेलियन ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशन’ने केले. या उपक्रमाला पश्चिम ऑस्ट्रेलिया सरकारच्या ‘इन्व्हेस्ट अँड ट्रेड वेस्टर्न ऑस्ट्रेलिया’चे सहकार्य लाभले. पुण्यात शिष्टमंडळाने विद्यापीठे आणि शाळांशी संवाद साधला. भारतीय विद्यार्थ्यांच्या बदलत्या अपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे, शैक्षणिक सहकार्य आणि विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक मार्गांच्या संधींचा शोध घेणे; तसेच ऑस्ट्रेलियन आणि भारतीय शैक्षणिक



संस्थांमधील संबंध अधिक मजबूत करणे, यावर या संवादात भर देण्यात आला. उच्च शिक्षण, कौशल्य विकास, संशोधन आणि नवोन्मेष या क्षेत्रांतील विद्यार्थी देवाणघेवाण, संस्थात्मक सहभाग आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील शैक्षणिक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी ही भेट महत्त्वाची ठरणार आहे. शिष्टमंडळाच्या भेटीविषयी बोलताना ‘ऑस्ट्रेलियन ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशन’चे (ऑस्ट्रेड) व्यापार आणि गुंतवणूक आयुक्त विक सिंह म्हणाले, ‘भारत हा ऑस्ट्रेलियासाठी महत्त्वाचा आणि मोलाचा शैक्षणिक भागीदार आहे. पुण्यातील आमचा हा संवाद विद्यार्थी आणि शैक्षणिक संस्थांचे म्हणणे ऐकून घेण्याची, त्यांच्या अपेक्षा समजून घेण्याची; तसेच ऑस्ट्रेलियन आणि भारतीय शैक्षणिक संस्थांमध्ये अधिक मजबूत संबंध कसे निर्माण करता येतील, याचा शोध घेण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी ऑस्ट्रेलियाकडे केवळ शिक्षणासाठीचे ठिकाण म्हणून पाहू नये, तर जागतिक दर्जाचे शिक्षण, प्रत्यक्ष अनुभव आणि जागतिक स्तरावरील करिअरच्या संधींच्या माध्यमातून स्वतःच्या भविष्याला आकार देण्याचे ठिकाण म्हणून पाहावे, अशी आमची इच्छा आहे.’

## चोरांना वाचवण्यासाठी संन्याशांना फाशी: डॉ. कोल्हे

**■ नारायणगाव (दै. संध्या)**

अंगणवाडीमध्ये लहान मुलांना दिला जाणारा पोषण आहार हा निकृष्ट दर्जाचा असल्याचा व्हिडीओ एका अंगणवाडी सेविकेने सोशल मीडियावर शेअर करत तक्रार केली होती. अंगणवाडीमध्ये लहान मुलांना दिला जाणारा पोषण आहार हा निकृष्ट दर्जाचा असल्याचं सांगत पांढरा वाटाणा आणि भरडा कुकरच्या ९ ते १० शिट्ट्यानंतरही शिजत नाही. त्यामुळे अशा निकृष्ट आहारावर निर्बंध घालण्याची मागणी अंगणवाडी सेविका रेश्मा पारधी यांनी केली होती.

या अंगणवाडी सेविकेने व्हिडीओ शेअर करत सत्य मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतर अंगणवाडी सेविका रेश्मा पारधी यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे .या निलंबनाच्या कारवाईचा खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अंगणवाडीतील आहाराच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करणाऱ्या सेविकेवर कारवाई करणे अत्यंत दुर्दैवी असून, “चोरांना वाचवण्यासाठी संन्याशांना फाशी देण्याचा हा प्रकार आहे,” अशी टीका डॉ. कोल्हे यांनी केली. जे हरभरे, वाटाणे आणि काबुली चणे अनेक शिट्ट्या देऊनही शिजत नाहीत, ते आधी संबंधितांनी स्वतः खाऊन दाखवावेत, असेही त्यांनी उपरोधिकपणे म्हटले. कागदपत्रांच्या आधारे सेविकेचा मार्ग चुकीचा ठरू शकतो; मात्र तिचा हेतू काय होता, हे अधिक महत्त्वाचे आहे, असे डॉ. कोल्हे यांनी स्पष्ट केले. पोषण आहाराची खरेदी राज्यस्तरावर केली जाते. त्यामुळे सेविकेवर कारवाई करण्यापूर्वी आहाराचा पुरवठा करणारे ठेकेदार, कंत्राटदार तसेच साहित्याच्या गुणवत्तेची तपासणी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

## डीजीपींच्या निर्देशानंतरही पॉक्सो गुन्हा दाखल करण्यास पालघर पोलिसांची चालढकल ?

**■ मुंबई (दै. संध्या)**

पालघर येथील १० वर्षीय अल्पवयीन मुलीवरील कथित लैंगिक अत्याचाराच्या तक्रारीप्रकरणी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक कार्यालयाने पालघरचे पोलीस अधीक्षक यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिल्यानंतरही संबंधित प्रकरणात गुन्हा दाखल करण्यास विलंब होत असल्याचा गंभीर आरोप तक्रारदार सौ. लक्ष्मी शिवराम भोसले उर्फ साजिदा सरफराज अंसारी यांनी केला आहे. मुंबई प्रेस क्लबमध्ये पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.

त्यामुळे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या निर्देशानंतरही स्थानिक पातळीवर नेमकी कोणती कार्यवाही सुरु आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. तक्रारदारांनी १४ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक यांच्याकडे सविस्तर तक्रार करून आपल्या १० वर्षीय मुलीने कथित अत्याचाराबाबत ४ ऑगस्ट रोजी माहिती दिल्याचे नमूद केले होते. त्यानंतर कुटुंबीयांनी पालघर पोलिसांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तसेच आपत्कालीन ११२ क्रमांकावर संपर्क साधला. या संपकोची CFS38537073 या संदर्भ क्रमांकाने नोंद झाल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. तक्रारीत मुलीची वैद्यकीय तपासणी ग्रामीण रुग्णालय, पालघर येथे झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. तसेच पालघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेल्यानंतर पोलिसांकडून अपेक्षित सहकार्य मिळाले नसल्याचा आणि मुलीशी कथितरीत्या धमकीच्या स्वरुपात वर्तन करण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर तक्रारदारांनी १९ ऑगस्ट रोजी पोलीस महासंचालकांची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी विनंती केली.

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विशेष नैपुण्य प्राप्त शिक्षक, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**■ पुणे (दै. संध्या)**

शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविण्याची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्वाला आकार देऊन अस्तित्वाला अर्थ देणारी प्रक्रिया आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळविण्यासोबतच जिज्ञासा, चिकाटी आणि शिस्त या मूल्यांची जोपासना केली आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत संवेदनशीलता, प्रामाणिकपणा, शिस्त आणि कृतज्ञता हे गुण अंगीकारून त्यांना शिक्षण देणाऱ्या संस्था, शिक्षक आणि पालकांप्रती सदैव कृतज्ञ राहावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित विशेष नैपुण्य प्राप्त शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, मानद सचिव संदीप कदम, महिला प्रदेशाध्यक्ष वैशाली नागवडे, सेवक सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, शिक्षणाशिवाय व्यक्तीच्या मूल्यांचा आणि संस्कारांचा विकास पूर्ण होऊ शकत नाही. शिक्षण माणसाला केवळ साक्षर करत नाही, तर सजग बनवून त्याला जगण्याचा व्यापक दृष्टिकोन देते. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक यशामागे त्यांची जिद्द, पालकांचा त्याग आणि शिक्षकांची दूरदृष्टी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालक आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळ ही स्वर्गीय अजितदादांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असून महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील एक महत्त्वाची संस्था आहे. संस्थेने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. संस्थेला अधिक गती आणि योग्य दिशा देताना स्वर्गीय अजितदादांनी जपलेली पारदर्शकता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये पुढे नेण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, असेही त्यांनी सांगितले. संस्थेची प्रगती वेगाने साधण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करताना शिस्त आणि पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

## एचव्ही देसाई आय हॉस्पिटल येथे आशा व अंगणवाडी सेविकांसाठी विशेष कार्यक्रम

### तळागाळातील नेत्र आरोग्याला बळकटी देण्याचा प्रयत्न

**■ पुणे (दै. संध्या)**

पीबीएमएच्या एचव्ही देसाई आय हॉस्पिटल येथे नुकतेच आशा व अंगणवाडी सेविकांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यामध्ये 20 समुदाय आरोग्य अधिकारी (कम्युनिटी हेल्थ ऑफिसर्स - सीएचओ) सह भोर तालुक्यातील 200 आशा व अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.हा उपक्रम कृषी सभापती अमोल नलावडे यांच्या नेतृत्वाखाली हाती घेण्यात आला.याप्रसंगी अमोल नलावडे यांसह तालुका आरोग्य अधिकारी डॉ.देवकर व डॉ.तिडके ,स्थानिक प्रतिनिधी किरण राऊत विशाल कोंडे, व माऊली खुटवड तसेच जिल्हा परिषद सदस्य प्रवीण जगदाळे, उपस्थित होते.

दिवसभर आयोजित केलेल्या या कार्यक्रमात आशा व अंगणवाडी सेविकांनी एचव्ही देसाई आय हॉस्पिटलच्या विविध विभागांना भेट देऊन कार्याची माहिती घेतली.त्यानंतर रूग्णालयातील शंकरशेठ साबळे सभागृहात त्यांच्यासाठी हॉस्पिटलच्या विविध वैद्यकीय सेवांची माहिती,सामान्यपणे आढळणारे विविध नेत्र आजार,याची प्राथमिक लक्षणे याबाबत नेत्रतज्ञांनी सादरीकरण केले. याप्रसंगी पीबीएमएच्या एचव्ही देसाई आय हॉस्पिटलचे कार्यकारी संचालक परवेझ बिलिमोरिया,कार्यकारी वैद्यकीय संचालक (नेटवर्क) डॉ.कुलदीप डोळे,युनिट व लॅसिक



विभागप्रमुख डॉ.वर्षा पुराणिक,प्रकल्प संचालक डॉ.प्रविण नरवाडकर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमानंतर आशा व अंगणवाडी सेविकांसाठी मोफत नेत्र तपासणी व गरज असलेल्यांना मोफत चष्मा वाटप करण्यात आला. आशा व अंगणवाडी सेविका या समुदाय आणि आरोग्य यंत्रणेमधील एक महत्त्वाचा दुवा असतात.विशेष करून ग्रामीण भागातील कुटुंबियांसोबत त्यांचा संवाद असतो. त्यामुळे आरोग्याच्या कुठल्याही समस्या ओळखून योग्य वेळी निदान व उपचार मिळवून देण्यासाठी तसेच प्रतिबंधात्मक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ते महत्त्वाची भूमिका बजावतात.याआधी एचव्ही देसाई आय हॉस्पिटल येथे वेल्हे तालुक्यातील आशा व अंगणवाडी सेविकांसाठी अशाच प्रकारचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

पीबीएमएच्या एचव्ही देसाई आय हॉस्पिटलचे कार्यकारी वैद्यकीय संचालक (नेटवर्क) डॉ.कुलदीप डोळे म्हणाले की, विशेष करून ग्रामीण व निमशहरी भागातील लोकांमध्ये नेत्र आरोग्याबाबत जागरूकता वाढवण्यामध्ये आणि नेत्र समस्या असलेल्या लोकांमध्ये लक्षणे ओळखून त्यांना योग्य वेळेत उपचार मिळवून देण्यामध्ये अशा प्रकारचे उपक्रम महत्त्वाचे ठरतात.